


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०३७ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

| नगराध्यक्ष २८८/२८८ | | |
|---|---|---|
| **महायुती २१४** | | |
| भाजप ११८ | शिवसेना ५९ | राष्ट्रवादी ३७ |
| **मविआ ४९** | | |
| काँग्रेस ३२ | शिवसेना (ठा) ९ | राष्ट्रवादी (श) ८ |

## राज्यातील 288 नगरपालिकांचे निकाल

# भाजप सर्वात मोठा पक्ष; शिंदे दुसऱ्या स्थानी

### महाविकास आघाडीचा धुव्वा

- विकासावर मते मागितली, लोकांनी चांगला प्रतिसाद दिला
- भाजपचे ३३०२ नगरसेवक, हा नवा विक्रम

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील 246 नगरपरिषदा व 42 नगरपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी आज झाली. सध्याच्या आकडेवारीनुसार, महायुतीचे सर्वाधिक 213 नगराध्यक्ष निवडून आले असून, महाविकास आघाडीला अवघ्या 50 जागांवर समाधान मानावे लागले आहे. 117 नगराध्यक्ष मिळवत भाजप राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

महाराष्ट्रात भाजपाचे 129 नगराध्यक्ष विजयी झाले असून 3 हजारांपेक्षा जास्त नगरसेवक विजयी झाले आहेत. भाजपाला 2017 पेक्षा मोठा विजय मिळाला. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात हे मोठे यश मिळाले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. भाजपने 129 नगराध्यक्षपदावर विजय मिळवला असून महायुतीच्या तिघांचे मिळून जे नगराध्यक्ष आहेत ते 75 टक्के आहेत. नगरसेवकपदावर भाजपने नवा रेकॉर्ड केला आहे. यापूर्वीच्या 2017 च्या निवडणुकीत भाजपचे 1602 नगरसेवक होते, आता त्याच्या दुपटीचे 3302 नगरसेवक आहेत, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी पूर्ण सकारात्मक प्रचार केला. सगळ्या सभांमध्ये मी विकासावर मत मागितली. तसेच आम्ही काय विकास करणार आहोत याची ब्ल्यु प्रिंट मांडली आणि याला लोकांनी चांगला प्रतिसाद दिला. लोकांनी आमच्या विकास कामांवर दिलेली पावती आहे. आज देशात मोदींच्या नेतृत्वात भाजपबद्दल जी काही सकारात्मकता आहे याचा फायदा आम्हाला झालेला आहे. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय नेतृत्वाने आमच्यावर ही जबाबदारी दिली होती. प्रत्येक विभागात आमचे जे नेते आहेत, चंद्रकांत दादा असतील, गिरीश महाजन असतील, मराठवाड्यातले नेते असतील, सर्वांनीच चांगले काम केले आहे. सगळ्या मंत्र्यांना आम्ही जी जबाबदारी दिली होती, ती देखील त्यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने निभावली आहे. हा विजय आमच्या सगळ्यांचा आहे. लोकांनी जो विश्वास आमच्यावर दाखवला आहे, त्यांच्या विश्वासाला आम्ही तडा जाऊ देणार नाही, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

आता विरोधक हे सांगायला मोकळे आहेत की आम्ही या निवडणुका गांभीर्याने घेतल्या नाहीत, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी लगावला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले, कारण त्यांना पराभव होणार हे माहीत होते. परंतु, भाजप किंवा महायुती म्हणून आम्ही प्रत्येक ठिकाणी गेलो, कारण जे कार्यकर्ते आम्हाला विधानसभा किंवा लोकसभेत आम्हाला निवडून आणतात, त्यांच्या निवडणुकीसाठी आम्ही त्यांच्यासाठी गेलेच पाहिजे. नागपूर जिल्ह्यात खूपच चांगले यश आम्हाला मिळाले आहे. विशेषतः आमचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे याच्यात विशेष श्रेय आहे, कारण त्यांनी स्वतः प्रत्येक ठिकाणी लक्ष ठेऊन सगळ्या लोकांना सोबत ठेऊन काम केले. कामठीमध्ये पहिल्यांदाच भाजपचा नगराध्यक्ष निवडून आला आहे. एकूणच तुम्ही बघितले तर 15 जागा अशा आहेत जिथे आमचे बहुमत होते, पण दुर्दैवाने अत्यंत कमी फरकाने आमचे नगराध्यक्ष पराभूत झाले.



### महाराष्ट्रात भाजपच नंबर १

2014 पासून कोणतीही निवडणूक काढा, तेव्हा पासून झालेल्या सगळ्या निवडणुकीत भाजपने चांगला विजय मिळवला आहे आणि शहर आणि गावांच्या विकासावर आम्ही भर दिला आहे. भाजप हा सर्व जातींचा आहे आणि महाराष्ट्राचा नंबर 1 पक्ष हा भाजपच आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.




### नगरपालिका निवडणुकीत युवाशक्तीचा डंका

**सोलापूर : (समर्थ गांवकरी)**

सोलापूर जिल्ह्याच्या मोहोळ नगरपरिषदेच्या अटीतटीच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने भारतीय जनता पक्षाला जबरदस्त धक्का दिला आहे. शिवसेनेच्या उमेदवार सिद्धी वस्त्रे यांनी भाजपच्या उमेदवार शीतल क्षीरसागर यांचा पराभव करत नगराध्यक्ष पदावर कब्जा केला. विशेष म्हणजे, अवघ्या 22 व्या वर्षी ही किमया साधणाऱ्या सिद्धी वस्त्रे या राज्यातील सर्वात तरुण महिला नगराध्यक्ष ठरल्या आहेत. तर बुलढाणा येथील सिंदखेडराजा नगरपरिषदेत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे सौरभ तायडे हे सर्वात कमी वयाचे नगराध्यक्ष ठरले आहेत. मोहोळ हा भाजपचा आणि विशेषतः माजी आमदार राजन पाटील यांचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र, या निवडणुकीत शिवसेनेने या बालेकिल्ल्याला मोठे खिंडार पाडले आहे. सिद्धी वस्त्रे यांनी भाजपच्या शीतल क्षीरसागर यांचा 170 मतांच्या फरकाने पराभव केला. या निकालाने सोलापूर जिल्ह्यातील भाजपच्या गोटात कमालीची अस्वस्थता पसरली आहे.

### विजयानंतर लगेच ठाकरेंचा नगराध्यक्ष शिंदेंच्या गळाला

**श्रीवर्धन : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांचे निकाल आज (21 डिसेंबर) स्पष्ट होत असतानाच रायगड जिल्ह्याच्या राजकारणात एक मोठा भूकंप झाला आहे. श्रीवर्धन नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे अतुल चौगुले दणदणीत बहुमताने निवडून आले आहेत. मात्र, विजयाचा गुलाल अंगावर असतानाच एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंचा हा विजयी नगराध्यक्ष आपल्या गळाला लावला आहे. विशेष म्हणजे, अतुल चौगुले यांनी विजयाचे श्रेय एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्यांना दिले असून, ते शिंदे सेनेत प्रवेश करणार आहेत. हा उद्धव ठाकरे यांच्यासाठी कोकणात मोठा धक्का मानला जात आहे. श्रीवर्धन नगरपालिकेची निवडणूक अत्यंत चुरशीची ठरली. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उमेदवाराला पराभूत करण्यासाठी शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार आणि मंत्री भरतशेठ गोगावले यांनी मोठी खेळी खेळली. सुनील तटकरेंचा पराभव करण्यासाठी त्यांनी पडद्याआडून ठाकरे गटाचे उमेदवार अतुल चौगुले यांना ताकद दिली. दोन्ही शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे काम केल्यामुळे तटकरेंच्या उमेदवाराला पराभवाची धूळ चारावी लागली.









**जाहीरात सौजन्य :** मा.श्री.भिमाशंकर तोरमल.. जिल्हा अध्यक्ष.. अहील्यानगर जिल्हा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना.....मा.श्री.आत्माराम रंधे.. कार्यकारी संचालक जनलक्ष्मी पतसंस्था अकोले. मा. श्री अशोकराव शिंदे. कार्यकारी संचालक...ए एस .इन्वेस्टमेन्टस प्रा लि ..मा.श्री.अनिल नाईकवाडी. पत्रकार दैनिक सकाळ

# शहीद जवान संदीप गायकर यांच्या कुटुंबीयांना एक लाखांचा निधी

## ब्राम्हणवाड्यात भावनिक सन्मान सोहळा!




**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

ब्राम्हणवाडा (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) — देशसेवेसाठी प्राणांचे सर्वोच्च बलिदान देणारे ब्राम्हणवाडा गावचे वीर सुपुत्र शहीद संदीप पांडुरंग गायकर (शहीद दिनांक : २२ मे २०२५) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हम है ना..! फाऊंडेशन, पुणे यांच्या वतीने कृतज्ञता निधी व सन्मान प्रदान सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले. या प्रेरणादायी सोहळ्यात शहीद जवानांच्या कुटुंबीयांना ₹१,००,००० (एक लाख) रुपयांचा धनादेश सुपूर्त करून राष्ट्रकृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यात आली.

शनिवार, २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८.३० ते दुपारी १२.०० या वेळेत सह्याद्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, ब्राम्हणवाडा येथे हा कार्यक्रम अत्यंत भावनिक व देशभक्तीमय वातावरणात पार पडला. यावेळी शहीद संदीप गायकर यांचे आई-वडील तसेच त्यांची वीर पत्नी दिपाली संदीप गायकर यांची उपस्थिती सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली.

प्रभात फेरीने कार्यक्रमाची सुरुवात : कार्यक्रमाच्या प्रारंभी सकाळी गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. त्यानंतर उपस्थित मान्यवर, माजी सैनिक व ग्रामस्थांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. "एक शहीद – एक वृक्ष" या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धन व राष्ट्रप्रेमाचा सुंदर संगम साधण्यात आला.

देशभक्तीपर गीतांनी भारले वातावरण : कार्यक्रमाला सुरुवात होताच मयूर सुकाळे यांच्या देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले. या गीतांनी उपस्थितांच्या मनात देशप्रेम, त्याग व कृतज्ञतेची भावना अधिक प्रखर केली. संपूर्ण सभागृहात राष्ट्रनिष्ठेचे वातावरण अनुभवायला मिळाले.

वीर पत्नीचा सन्मान, माजी सैनिकांचा गौरव : या सोहळ्यात वीर पत्नी दिपाली संदीप गायकर यांना स्मृतीचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात आला. त्यांच्या त्याग, धैर्य व देशासाठी दिलेल्या योगदानास उपस्थितांनी उभे राहून मानवंदना दिली.

तसेच भारतमातेच्या सेवेसाठी लढलेले माजी सैनिक यांचा सन्मान स्मृतीचिन्ह, वृक्ष व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. हे सन्मानचिन्ह केवळ व्यक्तींचा नव्हे, तर संपूर्ण सैन्यदलाच्या शौर्याचा गौरव असल्याची भावना यावेळी व्यक्त झाली. राष्ट्रप्रतिज्ञा व घोषणा : कार्यक्रमादरम्यान उपस्थितांकडून भारत देशासाठी राष्ट्रप्रतिज्ञा घेण्यात आली. त्यानंतर "भारत माता की जय", "वीर जवान संदीप गायकर अमर रहे" अशा जोशपूर्ण घोषणा देत संपूर्ण परिसर देशभक्तीने भारावून गेला.

मान्यवरांचे मार्गदर्शन व आठवणींना उजाळा : या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी शहीद संदीप गायकर यांच्या शौर्य, कर्तव्यनिष्ठा व बलिदानाच्या आठवणींना उजाळा देत, समाजाने नेहमीच शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले.

प्रमुख आमंत्रित मान्यवर : श्री. रमेश शिवाजी डुंबरे (बिझनेस डेव्हलपमेंट हेड, सुदर्शन केमिकल्स, पुणे),

श्री. दिपकजी पायगुडे (मा. आमदार, संस्थापक लोकसेवा शिक्षण संस्था, पुणे), डॉ. सदानंद राऊत (महाराष्ट्र भूषण, प्रसिद्ध सर्पदंश तज्ज्ञ),

मा. कृष्णा ढोकले (शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार सन्मानित, एव्हरेस्टवीर गिर्यारोहक).

आदरणीय उपस्थिती : श्री. किरणकुमार कबाडी (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, अहिल्यानगर), शिवनेरी माजी सैनिक संघ, पुणे — अध्यक्ष व सदस्य, प्रा. मच्छिंद्र देशमुख (पत्रकार, दै. लोकमत / प्रदेश संघटक, वंदे मातरम्), लेफ्टनंट उमेश अवचट (निवृत्त, भारतीय सेना),

माजी सैनिक संघ, ता. अकोले — अध्यक्ष व सदस्य, श्री. रमेश खरमाळे (माजी सैनिक व वृक्षसंवर्धक), सरपंच संतोष भांगरे, उपसरपंच सुभाष गायकर, माजी उपसरपंच भारत आरोटे, सुनिता शेलार (मुख्याध्यापिका सह्याद्री विद्यालय), सचिन आरोटे (संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती अकोले),

दीपक गायकर (संचालक, विविध कार्यकारी सोसायटी, ब्राम्हणवाडा), समस्त ग्रामस्थ ब्राम्हणवाडा, तसेच सह्याद्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयचे प्राचार्य, शिक्षकवृंद व विद्यार्थी.

समाजाला प्रेरणा देणारा सोहळा : हा कृतज्ञता निधी व सन्मान प्रदान सोहळा केवळ आर्थिक मदतीपुरता मर्यादित न राहता, समाजात देशभक्ती, कृतज्ञता व सामाजिक बांधिलकीची भावना दृढ करणारा ठरला. शहीद जवानांचे बलिदान कधीही विसरले जाणार नाही, हा ठाम संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

हा संपूर्ण कार्यक्रम हम है ना..! फाऊंडेशन, पुणे यांच्या वतीने अत्यंत शिस्तबद्ध, भावनिक व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

# सभापती प्रा. राम शिंदे यांनी बाजी मारली



- जामखेड नगरपरिषद मधे भाजपची निर्विवाद वर्चस्व. एक हाती सत्ता

**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

आजच मतमोजणी झाली. सुरवातीला काही काळ तनाव निर्माण झाला होता.. गोंधळ झाला होता. परंतु काही काळानंतर मत मोजनी सुरू झाली. आणि शेवट पर्यंत शांततेत पार पडली. प्रशासनाने कौशल्य पणाला लावून शांततामय वातावरण निर्माण केले.

या निवडणुकीत भाजपने पहिल्या पासून आघाडी घेतली होती. मग ते उमेदवार निश्चित करणे.. प्रचारात आघाडी घेतली. ती आघाडी कायम ठेवली. सभापती राम शिंदे साहेब यांनी महिनाभर जामखेड ला तळ ठोकून प्रचारात सक्रिय राहुन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. प्रोत्साहित केले.. परिणामी भाजप मोठ्या विजया कडे गेला...आ. रोहित पवार गट चितपट झाला... २४ जागा लढुन अवघ्या पाच जागांवर समाधान मानावे लागले आहे.. या निवडणुकीत नामदार शिंदे सर यांनी आमदार रोहित पवार यांना पुरते पराभूत केले. विधानसभेचा वचपा काढला आहे असि चर्चा जामखेड शहरात होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गट चितपट. तर भाजप ला त्यांच्या पेक्षा जागा तिप्पट.. या निवडणुकीत भाजपने सोशल इंजिनिअरिंग योग्य प्रकारे वापरले.. जातीय समीकरण बरोबर बसवले. त्यामुळे विजय सुकर झाला..

भाजप ने या पुर्वी माधव पॅटर्न वापरला आहे. परंतु या निवडणुकीत माधवराव.....पॅटर्न पहिल्यांदा वापरला आहे. त्याचा चांगला परिणाम झाला. नवीन मतदार आकर्षीत केला..

परिणामी स्पष्ट बहुमत मिळाले आहे.. उदा. प्रथमच वंजारी.. पारधी. व्हिजीएनटी. समाजाला प्रथमच उमेदवारी दिली. धाडस केले.. ते धाडस कामी आले.. या निवडणुकीत भटक्या विमुक्त जमाती. जातीचे.. ईतर मागासवर्गीय समाजातील उमेदवार मोठ्या संख्येने निवडून आले आहेत.

# दिव्यात कोकण प्रतिष्ठान व टायगर ग्रुप आयोजित रक्तदान शिबीर

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

दिव्यात कोकण प्रतिष्ठान व टायगर ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने व मुंबादेवी ब्लड व तसालिमा सेंटर, नवी मुंबई यांच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय जनता पार्टी दिवा युवा मोर्चाचे सरचिटणीस शशिकांत (सतीश) मनोहर केळशीकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिराचे यंदाचे हे पाचवे वर्षं असून सदर शिबिराचे उदघाट्न श्री अनिल गावकर व मुरलीधर काका यांनी केले. सदर शिबिरात दिवा शहरातील अनेकांनी भाग घेऊन श्रेष्ठ दान असलेले रक्तदान केले.

# जऊळके खुर्द येथे बालआनंद मेळावा उत्साहात साजरा!

**खेड,राजगुरुनगर (समर्थ गांवकरी)**



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जऊळके खुर्द येथे आनंददायी शनिवार उपक्रमाअंतर्गत बालआनंद मेळावा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या मेळाव्यात शाळेतील विद्यार्थ्यांनी खाऊ गल्ली आणि आठवडी बाजार भरवून उपस्थित ग्रामस्थ, पालक आणि पाहुण्यांचे लक्ष वेधून घेतले.

खाऊ गल्लीत चहा-बिस्किटे, वडापाव, भजी, मिसळ, भेळ, पावभाजी, खारे फुटाणे, गुलाबजामून, पास्ता, इडली-सांबार, चॉकलेट आदी विविध पदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते. तर आठवडी बाजारात कांदे, कोथिंबीर, पालक, मेथी, मुळा, गाजर, भोपळा, शेवगा, भुईमूग, वांगी, टोमॅटो, मिरची तसेच अनेक प्रकारच्या पालेभाज्यांची मोठ्या प्रमाणावर आवक दिसून आली. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या या बाजारातून ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे खरेदी केली.

विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण होणे, व्यावहारिक ज्ञान मिळणे, आनंददायी शिक्षणाची अनुभूती येणे तसेच पालक व ग्रामस्थांचा शाळेतील सहभाग वाढवणे या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. खरेदीदरम्यान काही ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना हिशोब विचारला असता, विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने उत्तरे देत व्यवहार कौशल्याचे दर्शन घडवले.

या बालआनंद मेळाव्यास ग्रामस्थ, पालक आणि शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली. कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार कांतीराम बोऱ्हाडे, शाळेचे मुख्याध्यापक संतोष हांडे तसेच शिक्षक मंगल पिंगळे, सतीश यानभुरे, वैशाली काळे आणि नेहा पवळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी शिक्षकांनी उपस्थित सर्व ग्रामस्थ, पालक व शालेय व्यवस्थापन समितीचे सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानले.

# नगरपालिकेतील अभूतपूर्व यशाचे श्रेय जनतेला - बाळासाहेब थोरात

- तालुका दुरुस्ती करण्यासाठी सज्ज व्हा
- संगमनेर विजयाची भव्य रॅली, विजयाची सिंहगर्जना

**संगमनेर: (समर्थ गांवकरी)**





संगमनेर तालुक्याला संस्कृत राजकारणाची परंपरा आहे मात्र मागील एक वर्षांमध्ये तालुक्यामध्ये दहशत आम्ही पदार्थांची तस्करी वाढली आहे. फ्लेक्सबाजीने शहर विद्रूप केले होते. याचा बंदोबस्त करू त्याचा बंदोबस्त करू अशा धमक्या दिल्या जात होत्या. शहरातील जनतेने दुरुस्ती केली असून तालुक्यातील दुरुस्तीसाठी सज्ज व्हा असे आवाहन मा. महसूलमंत्री तथा काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले असून हे अभूतपूर्व यश जनतेचे असल्याचे म्हटले आहे.

संगमनेर बस स्थानक येथे संगमनेर सेवा समितीच्या उमेदवारांच्या विजयानंतर झालेल्या भव्य रॅलीच्या समारोप प्रसंगी सभेचे बोलत होते यावेळी व्यासपीठावर मा आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, सौ दुर्गाताई तांबे, नूतन नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, उत्कर्षाताई रुपवते, डॉ.जयश्रीताई थोरात, विश्वासराव मुर्तडक ,जयवंत पवार, सोमेश्वर दिवटे अजय फटांगरे, निखिल पापडेजा यांच्यासह संगमनेर शहरातील विविध पदाधिकारी व कार्यकर्ते आणि संगमनेर सेवा समितीचे सर्व उमेदवार उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, महाराष्ट्रातील सर्वात मोठा विजय नगराध्यक्ष डॉ मैथिलीताई तांबे यांनी मिळवला असून सेवा समितीचे 30 पैकी 27 उमेदवार विजयी होणे हा अभूतपूर्व विजय जनतेचा आहे. आपण सातत्याने काम केले याचा अभिमान आहे निळवंडे धरण पूर्ण केली शहरासाठी पाईपलाईन आणली. शहरामध्ये पाईपलाईनचे जाळे निर्माण करून दररोज शुद्ध पाणी

# राजगुरुनगर नगरपरिषदेत शिंदे गटाचा झेंडा; मंगेश गुंडाळ यांची मुसंडी

**राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)**

राजगुरुनगर नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) यांनी दणदणीत विजय मिळवत नगरपरिषदेवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. नगराध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार मंगेश वंसतराव गुंडाळ यांनी प्रत्येक फेरीत आघाडी राखत बाजी मारली. दि. २१ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता तालुका क्रीडा संकुलात मतमोजणीला सुरुवात झाली. अवघ्या दीड तासात निकाल स्पष्ट होऊ लागले. सुरुवातीपासूनच आघाडीवर असलेल्या मंगेश गुंडाळ यांनी अखेर 7848 मते मिळवत विजयी घोषणा केली.

# दिवा स्टेशन जवळील तलाव तातडीने स्वच्छ करण्याची भाजपची मागणी

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**



दिवा स्टेशन जवळील तलाव तातडीने स्वच्छ करण्याची दिवा भाजपने मागणी केली आहे. दिवा शहरातील स्टेशन परिसरात असलेला एकमेव तलाव सध्या अत्यंत घाणेरड्या व दुर्लक्षित अवस्थेत असून तलावांचे शहर म्हणून ठाण्याची ओळख असलेल्यापैकी दिवा रेल्वे स्थानक पूर्वेकडील सदर तलावामध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा, प्लास्टिक, सांडपाणी तसेच जलकुंभ (हायसिंथ) साचलेले असून त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे. तलावाची ही अवस्था आरोग्याच्या दृष्टीने अतिशय धोकादायक असून मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तरी सदर तलावाची तातडीने स्वच्छता करून कचरा व जलकुंभ काढण्यात यावा, तसेच भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी योग्य ती नियमित देखभाल व्यवस्था करण्यात यावी व या गंभीर विषयाची तातडीने दखल घ्यावी असे निवेदनाद्वारे दिवा भाजप मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांनी दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांना केली आहे.




# श्रीमंतयोगी प्रतिष्ठान आयोजित आरोग्य शिबीर संपन्न

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

दिव्यात श्रीमंतयोगी प्रतिष्ठान आयोजित आज मोफत आरोग्य तपासणी शिबिर, आरोग्य तपासणी व संतोष अबगुल प्रतिष्ठान यांच्या मार्गदर्शनाने भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते यावेळी दिवा शहरातून शेकडो रक्तदात्यांनी रक्तदान केले सदर शिबिरात कोलेस्टरोल, मधुमेह, मोफत डोळे तपासणी व चष्मे देण्यात आले, (ECG) मोतीबिंदू शास्त्रक्रीया मोफत शास्त्रक्रिया,विना ऑपरेशन स्टोन काढणे,लेझर ऑपरेशन स्टोन काढणे,इंडोस्कोपी मुत्रपिंड किडनीचे विकार शास्त्रक्रिया आदी सर्व तपासण्या मोफत करण्यात आल्या तसेच तज्ञ डॉक्टरांच्या सल्याने मोफत औषधे देण्यात आली यावेळी मानवकल्याण रुग्णालयाचे,डॉ. गणेश ए. भामरे,डॉ. पराग जोशी,डॉ. सुनिल शेळके, डॉ. दिनेश थोरात,MS. डॉ. चेतन गाडेकर (HS UROLOGIST), डॉ. अरूण चंडेल,डॉ. स्वप्रिल बहानेB.D.S (दंत रोग तज्ञ) डॉ. रितू यालगी आदी तज्ज्ञ डॉक्टर शिबीरासाठी उपस्थित होते.

# सौ. पुष्पाताई लहामटे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमांची मेजवानी

## महिलांच्या सक्षमीकरणाला नवी दिशा! : डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून

**(समर्थ गांवकरी)**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या, नेतृत्व–दातृत्व–मातृत्वाचा संगम असलेल्या सौ. पुष्पा किरण लहामटे यांच्या २२ डिसेंबर रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्ताने अकोले तालुक्यात विविध समाजोपयोगी व महिलाभिमुख उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. औपचारिक शुभेच्छांपुरते न थांबता, समाजातील महिलांना सक्षम, आत्मनिर्भर व स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने हा वाढदिवस साजरा होत आहे.

सामाजिक–सांस्कृतिक कार्याचा ठसा : सामाजिक, सांस्कृतिक तसेच वारकरी संप्रदायातील सेवाभावी उपक्रमांसह विविध सामाजिक आंदोलने उभी करत पुष्पाताईंनी समाजकारणात सक्रिय सहभाग नोंदवला आहे. त्यांच्या कार्यातून महिलांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची दिशा मिळत आहे.

समाजकारणातील सक्रिय सहभाग : पुष्पाताई या अकोले विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या पत्नी असून, पतीच्या राजकीय व सामाजिक कार्यात त्या खंबीर साथ देतात. मात्र, महिला संघटन, आरोग्य, शिक्षण, स्वयंरोजगार आणि जनसंपर्क या क्षेत्रांत त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. विशेषतः अहिल्यानगर जिल्हा व अकोले तालुक्यातील त्यांचे योगदान प्रेरणादायी मानले जाते.



महिलांसाठी मोफत कौशल्य प्रशिक्षण : वाढदिवसानिमित्त महिलांसाठी मोफत मेकअप वर्कशॉप तसेच मोफत मेहंदी वर्कशॉप (बेसिक ते ॲडव्हान्स) आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यशाळांमधून ग्रामीण व शहरी भागातील महिलांना व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करून स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करता येणार आहेत. सहभागी महिलांना प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याने उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

हे उपक्रम आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या जनसंपर्क कार्यालयात — राजूर व अकोले येथे पार पडणार आहेत.

२२ डिसेंबर २०२५ रोजी विशेष कार्यक्रम : महिलांसाठी दिवसभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, त्यामध्ये— महिलांसाठी पाककला प्रशिक्षण, शेणापासून सुगंधी गौरी बनविण्याचे प्रशिक्षण, बचतगटांसाठी कर्ज उपलब्धतेविषयी मार्गदर्शन, महिलांसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन शिबिर, विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

वाढदिवसातून समाजसेवेचा संदेश : "माणूस पदाने नाही, तर सेवेने मोठा होतो" हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत पुष्पाताईंनी महिलांसाठी उपक्रमांची रेलचेल उभारली आहे. या उपक्रमांमुळे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, आरोग्य जागरूकता, कौशल्यवृद्धी व आत्मविश्वास वाढण्यास हातभार लागणार आहे.

भावी जिल्हा परिषद अध्यक्षा म्हणून अपेक्षा : सामाजिक बांधिलकी, संघटन कौशल्य आणि लोकसेवेचा अनुभव पाहता सौ. पुष्पाताई किरण लहामटे यांच्याकडे भावी जिल्हा परिषद अध्यक्षा म्हणून आशेने पाहिले जात आहे. त्यांच्या कार्यातून समाजाला नवी दिशा, महिलांना नवे बळ आणि विकासाला अधिक वेग मिळावा, हीच सर्वसामान्य जनतेची अपेक्षा आहे. सौ. पुष्पाताई किरण लहामटे यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या हातून अशीच समाजसेवा घडत राहो, हीच सदिच्छा.

# शिवचरित्राचे विद्यापीठ-प्रा. एस. झेड. देशमुख



**(समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राच्या वक्तृत्वाच्या नकाशावर फर्डे वक्ते म्हणून जी नामावली आपणास मिळते त्यातील एक नाव म्हणजे सोपानराव तथा एस.झेड.देशमुख. सरांना ओळखणारा महाराष्ट्रातील मोठ्या प्रमाणावर रसिक जन आहे. केवळ वक्तृत्वाची शैली म्हणून अनेक माणसे ओळखले जातात. अनेकदा माणसांकडे केवळ शैली आहेत मात्र विचार नाहीत असे आपला अनुभव असतो.मात्र देशमुख सर म्हणजे प्रचंड वाचनाचा प्रवास जसा आहे त्याप्रमाणे चिंतन, मननाची वाट चालणारे विचारवंत आहेत. शिवचरित्राचे अभ्यासक म्हणून त्यांना ओळखले जात असले, तरी शिवचरित्र हा इतिहासाचा भाग आहे. मात्र वर्तमानात प्रगतीची झेप घ्यायची असेल तर शिवचरित्रातून काय ? कसे ? कोणी ? शिकण्याची गरज आहे हे सहजपणे आपल्या व्याख्यानातून उघडून दाखवतात .इतिहास म्हणजे केवळ बखरी नाहीत. केवळ कथा, कादंबऱ्यांचा विषय नाहीत ,तर त्याद्वारे उंच भरारी घेऊन माणसाला प्रगतीची झेप घेता येते. यासाठी माणसाकडे हवे असते ती दृष्टी .अशी दृष्टी असणारी माणसं वर्तमानत फारसे नाहीत. पण जी आहेत त्यात प्राध्यापक देशमुखांचे नाव आवर्जून घ्यावे लागते.

अकोले सारख्या आदिवासी,डोंगराळ मानल्या गेलेल्या तालुक्यात विडी कामगाराच्या कुटुंबात जन्माला आलेले आलेले सोपानराव देशमुख. खरंतर परिस्थिती अत्यंत आर्थिक दृष्ट्या वाईट. सत्तर वर्षांपूर्वी विडी कामगार ,शेतकरी यांची समृद्धता म्हणजे तरी काय असणार ? याचा सहज पट उघडून पाहिला तर सारीच माणसं दारिद्र्यात पिचलेली असायची. असे असताना सुद्धा माणसाने स्वप्न पाहिले तर ती स्वप्न पूर्ण करण्यासाठी मनगटामध्ये शक्ती आणि मस्तकामध्ये विचार असतील तर त्यावर मात करता येते हे सरांच्या जीवन चरित्रावरून सहजतेने लक्षात येते. परीस्थितीशी दोन हात करत त्यांनी आपले कर्तृत्व सिध्द केले आहे.शिक्षण हेच परिवर्तनाचे साधन आहे हे त्यांनी ओळखले होते .त्यामुळे त्याच मार्गाने जाण्याचा निर्णय झाला.अखेर त्यांनी सनदी लेखापाल अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन पूर्ण केला.कधीकाळी हा अभ्यासक्रम म्हणजे कठीणातील कठीण अभ्यासक्रम मानला जात होता.मात्र मुळात बुध्दिवान असलेल्या देशमुख सरांनी तो सहजतेने उत्तीर्ण करत आपल्या व्यवसायाला संगमनेरात सुरूवात केली. हा अभ्यासक्रम पूर्ण करताना आयुष्यातील अनेक गोष्टींसाठी तडजोड करावी लागली. जगण्यातील आनंदाला दूर सारावे लागले. सुखाचे क्षण वाटयाला नाही .कारण परिस्थिती नाही, मात्र स्वप्न पाहिली होती त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करत उद्यासाठी आजचा क्षण दुखात घालवत त्यांनी अनेक संकटांवर मात केली. आपल्या ज्ञान आणि बुद्धीच्या जोरावर त्यांनी व्यवसायात चांगला जम बसवला. मात्र पैसा हे आपले सर्वस्व नाही हे त्यांना ज्ञात होते.. त्यामुळे आपण ज्या समाजातून आलो आहोत त्या समाजाचा योग्य दिशेने प्रवास घडवण्यासाठी प्रबोधनाची गरज आहे हे त्यांनी ओळखले होते.त्यांनी ईश्वरदत्त देणगी असलेल्या आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर लोकांमध्ये शहाणपण पेरण्याचे काम केले.

**संदीप वाकचौरे**

प्रा.एस.झेड यांना शिवव्याख्याते म्हणून लोक अधिक ओळखतात.शिवछत्रपती म्हणजे महाराष्ट्राची अस्मिता आहे.शिवचरित्राचा येथील माणसांनी अभ्यास केला तर बरेच प्रश्न सुटू शकतात ही त्यांची शिवचरित्राविषयी धारणा आहे. त्यांचे व्याख्यान ऐकताना शिवाजी महाराजाच्या विषयी अभ्यासाची खोली आणि दृष्टीकोन सहज जाणवत राहते.शिवाजी महाराज आणि त्यांचे चरित्र आपण समजावून घेतले नाही.जगाने महाराज समजावून घेतले मात्र आपण ते समजावून घेण्यात आपण कमी पडलो हे वास्तवाचे दर्शनही ते जगाला घडवतात.त्यांच्या मुखातून शिवचरित्र ऐकताना अंगावर शहारे उभे राहतात.त्यांचे वक्तृत्व म्हणजे नवरसाचा संगम असतो.विचाराची अत्यंत सुंदर मांडणी,सखोल चिंतन,सामाजिक जाणिवा,समाजाप्रति असलेल्या संवेदना आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यामुळे त्यांचे व्याख्यान म्हणजे चिंतनाची मांदियाळी असते. त्यांच्या या शैलीमुळे महाराष्ट्रभर त्यांना ओळखणा वर्ग आहे. प्रत्येक प्रसंग अत्यंत जाज्वल्य राष्ट्रभक्तीने भरलेला असतो. त्यामुळे ऐकणारा आपले भान हरपून श्रवण भक्ती करत असतो. त्यामुळे हदयाला भिडणारी त्यांची वक्तृत्व शैली अनेकाना त्यांच्या वक्तृत्वाच्या प्रेमात पाडते.त्यामुळे महाराष्ट्रभर त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. पुण्याच्या शनिवार वाडयावर अटलबिहारी वाजपेयी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते.राष्ट्रीय स्तरावरील वक्ते म्हणून अटलबिहारी यांना ओळखले जात होते.त्यांचे सामाजिक,राजकीय चिंतनही मोठे होते.अशावेळी ते व्यासपीठावर आल्यावर एकच वक्ता बोलणार असे संयोजकांनी ठरवले होते. त्या वक्त्याचे नाव होते प्रा. एस.झेड.देशमुख. सूत्रसंचालकाने देशमुख यांच्या नावाची घोषणा केली आणि कोणताही शब्द न उच्चारताच उपस्थित श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट सुरू केला.. सर बोलत होते आणि त्यातील अनेक प्रसंगाला टाळ्या मिळत होत्या. उपस्थितांच्या अंगामध्ये नवे वारे संचारले होते..त्यांच्या भाषणाची दखलही अटलबिहारी वाजपेयी यांना घ्यावी लागली होती.एकीकडे प्रचंड उत्तम वक्तृत्व आणि दुसरीकडे प्रचंड वाचन.आज समाजात वाचनाचा आलेख कमी होतो आहे.मात्र दुसरीकडे देशमुख सरांनी आपल्या आयुष्याची 75 वर्ष पूर्ण केल्यानंतरही हातातून पुस्तके सुटत नाही.आजही पुस्तकाच्या दुकानात जाणे आणि पुस्तक निवडणे हा त्यांचा स्वभाव.पुस्तक संग्रहाबरोबर पुस्तके वाचने ही त्यांची आवड अनेकांना आश्चर्यचकीत करणारी आहे. वाचनासाठी आपल्याकडे वेळ नाही .अशी सांगणारी अवतीभोवतीची माणसं पाहिली की कामाचा प्रचंड व्याप असून सुद्धा हा माणूस नियमितपणाने कसा वाचतो असा प्रश्न सहजतेने पडत जातो. वाचायला वेळ नाही असे म्हणणारी माणसं खोटे बोलत असावी असं सहजपणानं सरांकडे पाहिले की वाटत जाते.

जेव्हा केव्हा सरांकडे जातो तेव्हा त्यांचा पहिला प्रश्न असतो..नवे काय वाचतो आहे..? प्रत्येकवेळी आपण उत्तर द्यायचे काय वाचतो आहोत हे सांगायचे , मग त्यावेळी पुस्तकांवर दीर्घ चर्चा ठरलेली.मग तेही नवं काय वाचता याविषयी भरभरून बोलणार.पुस्तकांवर चर्चा घडताना प्रत्येक पुस्तकाविषयी ते जणू परिक्षणच.त्यासोबत प्रचंड संदर्भ त्यांचे तोंडपाठ असतात. आपल्या अवतीभोवती अनेक माणसं आपण पाहतो...त्यांची काही वैशिष्टये असतात.मात्र सरांचे वैशिष्टये म्हणजे प्रचंड संदर्भ ज्ञात असलेले चालते बोलते विद्यापीठच. अगदी दिनांक,सनावळ्या,पात्र सहजतेने उलगडून सांगतात.. जणू काही त्यांनी आताच वाचले आहे इतक्या सहजतेने ते सांगत असतात.एखाद्या व्यक्तीला त्यांनी वीस पंचवीस वर्षापूर्वी पाहिले असले तरी ते नाव,पत्यासह सर्व परिचय सांगतात.प्रचंड स्मरणशक्ती असलेले व्यक्तिमत्व म्हणून सर्वांना ते ज्ञात आहे.हे सारेच आश्चर्यकारक म्हणायला हवे.त्यामुळे प्रा.एस.झेड म्हणजे एक विद्यापीठच आहे.

सर म्हणजे केवळ बोलके सुधारक नाही तर ते कर्त्यांच्या समूहातील आहे.सरांनी आपल्या परीसरातील हातावर पोट असलेल्या अनेकाच्या आयुष्यात उत्तम जीवन जगता यावे म्हणून त्यांची निस्सिम श्रध्दा असलेल्या प्रभू श्रीरामचंद्राच्या नावाने पतसंस्था सुरू केली.अत्यंत उत्तम रितीने ती चालवली आहे. अनेकांच्या हाताला रोजगार मिळून देण्यात संस्था कामी आली आहे.सभासदांचा त्यांचेवर असलेल्या भरवशामुळे आर्थिक वाटही अधिक मजबूत बनली आहे.परीसरातील रेशन दुकान चालवणे असेल,महिला संस्था विकसित करणे हे सारेच महीलांच्या सक्षमीकरणाचा विचार त्यात दडलेला आहे.जे जे म्हणून चांगले करता येईल त्या त्या वाटा चालण्यासाठी ते दिशादर्शन करत आले आहे.आपण स्वातंत्र्याची 75 वर्ष पूर्ण केली असली तरी समाजात शहाणपण पेरण्याची निंतात गरज आहे.लोकांची होणारी फसवणूक,अविज्ञानवादी विचाराचा पगडा हे लक्षात घेऊन प्रबोधनासाठी त्यांनी प्रवचनाचा मार्ग अनुसरला आहे. सप्ताहापासून तर पुण्यस्मरणापर्यंत अनेक ठिकाणच्या व्यासपीठावर प्रा,देशमुख संताचा सत्य विचाराची पेरणी करत..प्रबोधन करत आहेत. संतांच्या विचारातच समाजाचे भविष्य आहे..पण ते विचार अधिक विज्ञानवादी विचाराची कास धरून पेरण्याची गरज आहे. ती वाट ते चालत आहेत म्हणून समाजाच्या शहाणपणातच उद्याचे राष्ट्र कल्याण आहे.. मुळात विदवान असूनही त्यांच्या भोवती माणसांचा सतत गराडा असतो.याचे कारण कोणत्याही स्वार्थाशिवाय माणसांशी संबंध जपणे हे त्यांचे स्वभाव वैशिष्टये असल्याने सतत ते माणसांच्या गराडयात असतात.माणूसपणाची उंची असल्याने त्यांच्या भोवती वयाचा विचार न करता अगदी बालकांपासून तर वृध्दांपर्यत सारेच त्यांच्या भोवती असतात.

पतित पावन संघटनेसारख्या संघटनेचे संस्थापक म्हणून त्यांना ओळखले जाते.संघटनेतील अनेकांच्या वाटेला संसद ,विधिमंडळ सदस्यत्व आले आहे .अनेकांना त्याचा राजकीय लाभ मिळाला आहे .मात्र सरांना असा राजकीय लाभ मिळू शकला नाही. प्रचंड ऊर्जा, क्षमता, बुद्धिमत्ता असूनही राजकारणाच्या क्षेत्रात त्यांचा उपयोग करून घ्यावा असे राजकीय पक्षांना खरंच वाटू शकले नसेल का? मुळात चांगली माणसे राजकारणात हवीत कशाला अशी साधारण सामाजिक धारणा बनत चालली आहे.त्यामुळे त्यांच्या वाट्याला राजकीय यश येऊ शकेल नसेल. राजकारणात संधी मिळू शकली नाहीत असे नाही.. मात्र ठरवले असते तर राजकारणामध्ये सुद्धा त्यांना यश मिळू शकले असते. पण जीवनाची तत्व ,निष्ठा, विचारधारा यांच्याशी प्रतारणा करायची नाही म्हणूनच त्यांच्या वाट्याला राजकारणाचे प्रवेशद्वार खुले होऊ शकले नाही .मात्र या माणसाने विचार कायम ठेवून आपला जीवनाचा प्रवास सुरू ठेवला आहे. राजकीय सत्तेत नाही म्हणून सरांची उंची कमी होत नाही. कदाचित त्यापेक्षा अधिक उंची समाज मनामध्ये कायम आहे. राजकारणाच्या पलीकडे त्यांना मानणारा ,त्यांच्यावर प्रेम करणारा एक मोठा वर्ग आजही आहे. माणूसपणाच्या उंचीवर असलेल्या सरांचा आज वाढदिवस आहे..त्यांच्या वाढदिवासाच्या निमित्ताने त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा....पुढील जीवन निरामय स्वरूपाचे लाभो हा सदिच्छा..

## सौ. पुष्पाताई किरण लहामटे यांच्या वाढदिवसानिमित्ताने

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून सत्कार व शुभेच्छा!



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

सौ. पुष्पाताई किरण लहामटे यांच्या २२ डिसेंबर रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्ताने त्यांचा गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला. अकोले तालुक्यातील बचत गट चळवळ ग्रामीण भागात प्रभावीपणे रुजवण्यासाठी आणि महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी रात्रंदिवस योगदान देणाऱ्या सौ. पुष्पाताई लहामटे यांना शाल, पुष्पगुच्छ, खोबरे, हार व साईबाबांची मूर्ती देऊन सन्मानित करण्यात आले. हा सत्कार डॉ. विश्वासराव आरोटे, राज्य सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक, यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी सौ. पुष्पाताई लहामटे यांच्या समाजोपयोगी कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास हरीभाऊ फापाळे (पत्रकार संघाचे सचिव), विद्याताई आवारी (राष्ट्रवादी काँग्रेस महिला तालुका अध्यक्षा) तसेच अमोल पुंडे (दैनिक गांवकरी कार्यालयीन व्यवस्थापक) यांची उपस्थिती होती. सौ. पुष्पाताई लहामटे यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना स्वयंरोजगार, बचत व स्वावलंबनाची दिशा मिळाल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी नमूद केले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेला हा सत्कार सोहळा प्रेरणादायी ठरला.

# पुणे जिल्ह्यात १७ पैकी १० नगराध्यक्षपदांवर अजित पवार गटाचा वर्चस्व

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्ह्यात झालेल्या नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल जाहीर होताच जिल्ह्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ पाहायला मिळाली आहे. तब्बल १७ पैकी १० नगराध्यक्षपदे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी जिंकत जिल्ह्यात आपले वर्चस्व ठसठशीतपणे सिद्ध केले आहे. या निकालामुळे पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांवर अजित पवार गटाचे वजन अधिक वाढले असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यात लक्ष लागलेल्या पुणे जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींचे निकाल जाहीर होताच, महायुतीतील घटक पक्षांमध्ये सत्ता वाटपाचे वेगवेगळे चित्र समोर आले आहे. काही ठिकाणी बहुमत एका पक्षाचे असताना नगराध्यक्षपद दुसऱ्या पक्षाकडे गेले असल्याने मतदारांनी दिलेला कौल हा व्यक्तिकेंद्रित व स्थानिक नेतृत्वावर आधारित असल्याचे स्पष्ट होते.

# चाकण नगरपरिषदेवर शिवसेनेचा (शिंदे गट) झेंडा

**चाकण : (समर्थ गांवकरी)**



संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या चाकण नगरपरिषदेच्या सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणुकीत झालेल्या चौरंगी लढतीत नगराध्यक्षपदी शिवसेना शिंदे गटाच्या अधिकृत उमेदवार मनीषा सुरेश गोरे यांनी जोरदार मुसंडी मारून तब्बल १४,९०५ मते मिळवत एकतर्फी दणदणीत विजय मिळवला. चाकण नगरपरिषदेच्या झालेल्या चुरशीच्या लढतीत शिवसेना शिंदे गटाने १३ जागा मिळवल्या तर राष्ट्रवादी काँग्रेसला १० जागांवर समाधान मानावे लागले.उबाठा मशाल गटाला १ आणि अपक्ष ला १ जागा मिळाली. निवडणूक जाहीर झाल्यानंतर बारा प्रभागांतील पंचवीस जागांपैकी तीन जागा बिनविरोध तर उर्वरीत २२ जागांसाठी ७१ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले होते. एकूण ३६ मतदान केंद्रावर ३३,१२५ मतदारांपैकी २४,६०५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजवला होता.

चाकण नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद ओबीसी महिलेसाठी राखीव असल्याने शिवसेना, भाजप,काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी आपापले स्वतंत्र उमेदवार उभे केले होते. राष्ट्रवादीचे दोन नगरसेवक बिनविरोध आणि शिवसेना शिंदे गटाचे एक नगरसेवक बिनविरोध निवडून आले होते.

चाकण नगराध्यक्षपदी स्वर्गीय आमदार सुरेशभाऊ गोरे यांच्या पत्नी मनीषा सुरेशभाऊ गोरे यांना १४,९०५ मते मिळाली. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार भाग्यश्री विवेक वाडेकर यांचा ६,९६० मतांनी पराभव केला.

चाकण नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे -

प्रभाग १ - साधना दीपक गोरे,प्रकाश लक्ष्मण गोरे व जयश्री विशाल नायकवाडी.प्रभाग २ - रुपाली राहुल कांडगे व रणजित सखाराम जरे. प्रभाग ३ - सुवर्णा श्याम राक्षे, अनिल इंदाराम लोहकरे.प्रभाग ४ - आरती प्रीतम परदेशी, प्रेम शिवाजी जगताप.प्रभाग ५- पूनम सुनील शेवकरी,नितीन गुलाब गोरे ( बिनविरोध ).प्रभाग ६ - स्वाती संतोष लेंडघर, हर्षद गेनभाऊ लेंडघर.प्रभाग ७ - वर्षा सुयोग शेवकरी (बिनविरोध ),सागर सुरेश बनकर.प्रभाग ८ - तृप्ती किशोर जगनाडे,आकाश ज्ञानेश्वर जाधव.प्रभाग ९ - अनिता श्रीराम घोगरे,मंगेश शिवाजी कांडगे. प्रभाग १० - विजया शिवाजी तोडकर,प्रकाश राजाराम भुजबळ ( बिनविरोध ).प्रभाग ११ - विजया दत्तात्रय जाधव,साहेबराव राजाराम कड.प्रभाग १२ - रेश्मा तुषार मुटके,धीरज प्रकाश मुटके हे निवडून आले आहेत.

# ‘सहकार मंथन’ परिसंवादात संस्थेचा गौरव!



**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

जागतिक सहकार वर्षाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय “सहकार मंथन – विचार सहकाराचा, विचार विकासाचा” या महत्त्वपूर्ण परिसंवादाचे आयोजन रविवार, दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आले होते. या परिसंवादात सहकार क्षेत्रातील हितसंबंधांचे जतन, प्रगतीशील उपक्रमांचे अनुभव आदान–प्रदान तसेच सहकार चळवळीच्या भविष्यातील विकासासाठी दिशादर्शक विचार मांडण्यात आले. या परिसंवादात सक्रिय सहभाग नोंदवून सहकार तत्त्वांचा प्रसार, व्यावसायिक प्रामाणिकता, सामाजिक जबाबदारी आणि जनहित जपण्याच्या दृष्टीने संस्थेने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेण्यात आली. यानिमित्ताने सहकार मंथन तर्फे संबंधित संस्थेचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

हा सन्मान महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर,

महाराष्ट्र राज्याचे साखर आयुक्त संजय कोलते, माजी आमदार वैभवराव पिचड तसेच ग्रीन वर्ल्ड कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष प्रल्हाद कोकरे

यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. सन्मान समारंभाप्रसंगी संस्थेचे संचालक माननीय सुनील दादा चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत चव्हाण तसेच उपमहाव्यवस्थापक बाळासाहेब चव्हाण हे उपस्थित होते. यावेळी बोलताना मान्यवरांनी सहकार चळवळ ही केवळ आर्थिक विकासापुरती मर्यादित नसून सामाजिक समता, विश्वास आणि लोककल्याणाची प्रभावी चळवळ असल्याचे प्रतिपादन केले. संस्थेने राबविलेल्या उपक्रमांमुळे सहकार क्षेत्रात सकारात्मक परिवर्तन घडत असून, भविष्यातही अशाच लोकाभिमुख आणि पारदर्शक पद्धतीने कार्य सुरू ठेवावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



### सर्वसामान्य महिला भगिनींच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या हक्कांच्या सोबती

# सौ. पुष्पाताई किरणजी लहामटे



(समर्थ गांवकरी)

"ती" या जगभर पसरलेल्या समाजाचा अविभाज्य घटक असणारी "ती" जगासोबत धावणारी व स्वतःला सिद्ध करणारी कणखर लढवय्या आणि तेवढीच हळवी सुद्धा "ती" अशाच "ती" च्यापैकी एक असणाऱ्या सौ.पुष्पाताई किरणजी लहामटे यांनी "ती" तिच्यासाठी निर्माण केलेली हक्काचे व्यासपीठ म्हणजे 'सोबती फाउंडेशन' आपल्या घरातून मिळालेला आमदार डॉ.किरणजी लहामटेचा वारसा पुढे चालवण्यासाठी सौ.पुष्पाताई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एकत्र येत "सोबती फाउंडेशन" स्थापन केली आणि महिलांसाठी झगडणाऱ्या महिलांचा एक समूह तयार झाला.

अकोले तालुक्यातील स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी नेहमी तत्पर आहेत 'सोबतीची' जेव्हा सुरुवात झाली तेव्हा आमच्यासमोर बरेच आव्हाने होते. काम करण्यासाठी मैदानात उतरले तेव्हा तिला येणाऱ्या समस्या आम्हांला ठळक दिसू लागल्या आणि आपण करत असलेल्या कामाची आपल्या समाजाला किती गरज आहे . याची जाणीव झाली तिला येणाऱ्या समस्या पासून "ती" तिला सोडवत एक पाऊल पुढे कसे घेऊन जाऊ मी यासाठी आमच्या म्हणजे "सोबती फाउंडेशन" मार्फत काम केले जाते. २०२४ साली स्थापन झालेल्या "सोबती फाउंडेशन" मार्फत सामाजिक शैक्षणिक आर्थिक शारीरिक बौद्धिक मानसिक व व्यावसायिक दृष्ट्या महिलांना सक्षम करणे हा मुख्य उद्देश व उद्दिष्ट सौ.पुष्पाताईचे आहे हेच उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पुष्पाताईच्या माध्यमातून विविध उपक्रम घेतले जातात.

यात महिलांना बचत गटाच्या माध्यमातून एकत्रित करत सक्षम करण्यासाठी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातात. यात महिलांसाठी केसाचे क्रेचेस बनवणे ,अगरबत्ती बनवणे ,वाती बनवणे तसेच बेसिक ॲडव्हान्स शिवण क्लास आदींचे प्रशिक्षण देण्यात आले. असून यातून अनेक महिलांना रोजगारांची संधी उपलब्ध झाली आहे. तसेच महिलांना "चूल आणि मूल" या संकल्पनेतून दूर करत "एक दिवस स्वतःसाठी" या उपक्रमातून पारंपारिक मंगळागौर स्पर्धा ,नवरात्रीत दांडिया स्पर्धा आदी सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्याच सोबत या महिलांनी स्वतः तयार केलेल्या वस्तुला मार्केट मिळून देण्यासाठी "कळसुआई" हा बचत गटाच्या प्रोडक्टचा महोत्सव सुरू करून आपल्या संसाराची धुरा सांभाळणाऱ्या महिलांना एक व्यासपीठ तयार करून दिले .

यावर्षी या "कळसुआई" महोत्सवात शंभर पेक्षा जास्त बचत गट सहभागी झाले होते. या "कळसुआई" महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या महिला बालकल्याण मंत्री कुमारी आदितीताई तटकरे ताईंच्या हस्ते करण्यात आले होते. शासनाच्या विविध योजनातून महिलांना एकत्रित करत बचत गट कसे तयार करावे त्यांना कर्ज कसे उपलब्ध व्हावे यासाठी सौ.पुष्पाताई प्रयत्न करत असतात आमदार डॉ. किरणजी लहामटे साहेबांच्या खांद्याला खांदा लावून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी पुष्पाताई कार्यरत असतात. आमदार डॉ. किरणजी लहामटे साहेबांप्रमाणे जनतेच्या सुखदुःखात हक्काची सोबती पुष्पाताई नेहमी उपस्थित असतात.

जेव्हा कधी सर्वसामान्य व्यक्ती घरी येतो त्यावेळेस स्वतःच्या हाताने चहापाणी व आपुलकीने विचारपूस करणाऱ्या या सर्वसामान्य घरातील आमदार डॉ. किरणजी लहामटे साहेबांच्या पत्नी म्हणून नव्हे तर एक सर्वसामान्य स्त्री म्हणून आपुलकीने विचारपूर करणाऱ्या महिलांना आधार वाटणाऱ्या हक्काच्या सोबती सौ पुष्पाताई लहामटे यांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

■ लेखन – सौ.निताताई दत्तात्रय आवारी ■
■ महिला तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अकोले ■
■ प्रतिनिधी – श्री.हरिभाऊ मंजुळ फापाळे ९३७१८०६०८३ ■













हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# अमृतसागर दूध संघाला 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार'



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्याची कामधेनू म्हणून ओळख असलेल्या अमृतसागर सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्या., अकोले या दूध संघास सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय व भरीव कामगिरीबद्दल ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

जागतिक सहकार दिनाचे औचित्य साधून ग्रीनवर्ल्ड, लीड जिडब्ल्यू फाउंडेशन आणि कॉसमॉस को-ऑप. बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सहकार मंथन' कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, ग्रीन वर्ल्डचे अध्यक्ष गौतम कोतवाल, कॉसमॉस को-ऑप. बँकेचे चेअरमन प्रल्हाद कोकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार अमृतसागर दूध संघाच्या वतीने चेअरमन मा. आ. वैभवराव पिचड, व्हा. चेअरमन रावसाहेब वाकचौरे, संचालक आनंदराव वाकचौरे, गोरक्ष मालुंजकर, शरद चौधरी, अप्पासाहेब आवारी, रामदास आंबरे, जगन देशमुख, अरुण गायकर, गंगाधर नाईकवाडी, सुभाष डोंगरे, बाबुराव बेनके, शिवाजी गायकर, सौ. अश्विनी धुमाळ, सौ. सुलोचना औटी, तज्ञ संचालक दयानंद वैद्य, बाळासाहेब मुंढे तसेच जनरल मॅनेजर दादाभाऊ सावंत यांनी स्वीकारला.

अमृतसागर दूध संघाने नेहमीच दूध उत्पादक शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून धोरणात्मक निर्णय घेतले असून, सामाजिक बांधिलकी जपत शेतकऱ्यांच्या संकटकाळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका घेतली आहे. सहकार क्षेत्रात केलेल्या या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

या पुरस्काराबद्दल प्रतिक्रिया देताना चेअरमन मा. आ. वैभवराव पिचड यांनी सांगितले की, "या यशामागे सर्व दूध उत्पादक शेतकरी, डेअरी, संचालक मंडळ, सभासद, अधिकारी व कर्मचारी यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी दाखविलेल्या विश्वासामुळेच हा सन्मान प्राप्त झाला आहे."

तर व्हा. चेअरमन रावसाहेब वाकचौरे यांनी, "चेअरमन वैभवराव पिचड यांच्या नेतृत्वाखाली आणि संचालक मंडळाच्या सहकार्याने अमृतसागर दूध संघाची वाटचाल भक्कमपणे सुरू असून, सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाची ही पावती आहे," असे मत व्यक्त केले.

अमृतसागर दूध संघाला हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल संघाचे सभासद, दूध उत्पादक शेतकरी, अधिकारी, कर्मचारी तसेच दूध डेअरींचे चेअरमन, व्हा. चेअरमन व संचालकांनी अभिनंदन केले आहे.

# राजगुरुनगर नगरपरिषदेवर धनुष्य बाण

**राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)**

राजगुरुनगर नगरपरिषदेवर अखेर शिवसेना (शिंदे गट) पक्षाचा झेंडा फडकला असून, नगराध्यक्षपदी मंगेश गुंडाळ हे मोठ्या फरकाने विजयी झाले आहेत.



लोकनियुक्त नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या चौरंगी लढतीत मंगेश गुंडाळ यांनी प्रथम क्रमांकाची ७८४८ मते मिळवत प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी (अजित पवार गट)पक्षाचे उमेदवार किरण आहेर यांचा २०९८ मतांनी पराभव केला. या अटीतटीच्या लढतीत आहेर दुसऱ्या क्रमांकावर राहिले, तर तिसऱ्या क्रमांकावर भारतीय जनता पक्षाचे शिवाजी मांदळे ३०७० मते मिळाली,आणि शिवसेना उद्धव गटाचे उमेदवार बापू थिगळे यांनी ९३९ मते घेत चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

राजगुरुनगर नगरपरिषदेच्या एकूण दहा प्रभागातून या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी एकूण ५ उमेदवार, तर नगरसेवकांच्या १८ जागांसाठी ५६ उमेदवार रिंगणात होते. यापूर्वीच तीन प्रभागांतून तीन उमेदवार बिनविरोध निवडून आले होते.

निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती. त्यानंतर निकालाबाबत नागरिक व कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली होती. सुमारे तीन आठवड्यांच्या विश्रांतीनंतर आज राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू क्रीडा संकुलात कडेकोट बंदोबस्तात मतमोजणी पार पडली. निकाल ऐकण्यासाठी मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व नागरिकांनी गर्दी केली होती.

माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख यांचे कट्टर समर्थक म्हणून मानले जाणारे मंगेश गुंडाळ यांनी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष पदाच्या रिंगणात उतरले होते.त्याबरोबर त्यांच्या वॉर्डातून महिला उमेदवार अश्विनी आवटे यांना निवडून आणून आवटे यांना नगरसेवक पदी मोलाची संधी दिली.

# हिमायतनगर नगरपंचायत निवडणूकीत काँग्रेसने मारली बाजी

**हिमायतनगर : (समर्थ गांवकरी)**

हिमायतनगर येथे नगराध्यक्ष पदासाठी कॉंग्रेस पक्षाचे शेख रफिक शेख मेहबूब हे विजयी झाले. व यांच्या सह काँग्रेसचे ८ जागेवर नगरसेवक पदासाठी उमेदवार निवडून आले आहेत . तर भाजपा ३ शिवसेना शिंदे गट २ व शिवसेना उबाटा गट ३ व राष्ट्रवादी शरद चंद्र पवार गट १ अशा एकुण १७ जागा निवडून आल्या सर्वात जास्त काँग्रेसच्या जागा निवडून आल्या जिल्ह्यात फक्त हदगाव सेना युती होती पण हिमायतनगर मध्ये युती नव्हती. भाजपचे संभाव्य उमेदवार डॉक्टर राजेंद्र वानखेडे हे रफिक भाईच्या लढतीच्या समोर टिकले नाही व त्यांना पराभव पत्करावा लागला. शेख रफीक शेख महबूब हे १६५० मतांनी निवडून आले. शहरात काँग्रेस उमेदवाराचे खालील पैकी नाव आहेत. नगराध्यक्ष शेख रफिक प्रभाग क्रमांक १ चालेल दर्शना शरद प्रभाग क्रमांक २ गुंडेवार विनोद गणपत प्रभाग क्रमांक ३ अब्दुल कंजूम फिरदोस प्रभाग क्रमांक ४ मेंडके संभाजी कमल प्रभाग क्रमांक ५ अश्विन बेगम अब्दुल कलाम प्रभाग क्रमांक ६ मुद्देवाड अरुणा भगवान प्रभाग क्रमांक ७ पंडित दर्शना रमेश प्रभाग क्रमांक ८ मिर्झा जीशान बॅग. प्रभाग क्रमांक ९ राठोड सुचिता कुणाल प्रभाग क्रमांक ११ आशिष बाबुराव सक्वान. प्रभाग क्रमांक ११ भारत माधवराव डाके. प्रभाग क्रमांक १२ विठ्ठल भीमराव ठाकरे प्रभाग क्रमांक १३ सरदार खान खालील खान. प्रभाग क्रमांक १४ म. मुझे तबा तवा मतीन. प्रभाग क्रमांक १५ शेख सलीम अभी इलियास प्रभाग क्रमांक १६ सलमा खान समद खान. प्रभाग क्रमांक १७ बल्पिलवाड सुभाष पोतना. अशाप्रकारे सर्व उमेदवारांनी विजय मिळवला आहे.




# चिट्ठीमुळे नशीब बदलले

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

मंचर येथील नगरपंचायत निवडणुकीत प्रभाग क्रमांक तीन मध्ये चुरशीची लढत होऊन तेथे शिवसेना पक्षाचे उमेदवार लक्ष्मण मारुती पारधी व भाजप पक्ष्याच्या उमेदवार ज्योती संदीप बाणखेले यांना 223 अशी समसमान मते पडली.त्यानंतर चिट्ठी टाकून त्यामध्ये लक्ष्मण मारुती पारधी हे विजयी झाल्याचे जाहीर करण्यात आले. प्रभाग क्रमांक तीन मध्ये लक्ष्मण मारुती पारधी व ज्योती संदीप बाणखेले यांच्यात लढत झाली. एकंदरीत लक्ष्मण पारधी आणि ज्योती बाणखेले यांमध्ये झालेल्या लढतीत समसमान मते पडल्याने चिठ्ठीच्या माध्यमातून लक्ष्मण पारधी हे नगरसेवक म्हणून निवडून आले.

# किनवट नगर परिषद निवडणूक : शिवसेना (उ.बा.ठा.)च्या सुजाता येंड्रलवार नगराध्यक्ष पदी ३९९६ मतांनी दणदणीत विजय

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत प्रस्थापित सत्तेला जोरदार धक्का बसला असून भारतीय जनता पक्षाला सत्ता गमवावी लागली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. सुजाता येंड्रलवार यांनी भाजपाच्या सौ. पुष्पा आनंद मच्छेवार यांचा ३९९६ मतांनी पराभव करत दणदणीत विजय मिळवला. येंड्रलवार यांना १०,४७७ मते तर मच्छेवार यांना ६,४८१ मते मिळाली. इतर पक्षांना विशेष यश मिळू शकले नाही. एकूण १० प्रभागांतील २१ नगरसेवकांच्या निवडीसाठी ही निवडणूक पार पडली. प्रभाग क्रमांक १ (अ) मध्ये भाजपाचे संतोष म्हरसकोल्हे यांनी केवळ १३ मतांनी विजय मिळवला. १ (ब) मध्ये अपक्ष प्रिती धिरज नेम्मानिवार यांनी ३८३ मतांच्या भक्कम फरकाने बाजी मारली. प्रभाग २ (अ) मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या अश्विनी जागर्लावार यांनी ३३९ मतांनी विजय मिळवला. प्रभाग ३ (अ) मध्ये शिवसेना (उ.बा.ठा.)च्या निलोफर भाटी विजयी झाल्या, तर ३ (ब) मध्ये अत्यंत चुरशीच्या लढतीत श्रीराम नेम्मानिवार यांनी भाजपाच्या फेरोज तंवर यांचा केवळ २ मतांनी पराभव केला; यासाठी दुबार मतमोजणीही करण्यात आली. प्रभाग ४ (अ) मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अभय नगराळे तर ४ (ब) मध्ये शेख नुरसबा शेख मुकद्दर विजयी ठरल्या. प्रभाग ५ (अ) मध्ये अपक्ष चंद्रशेखर नेम्मानिवार यांनी विजय मिळवला. प्रभाग ६ मध्ये राष्ट्रवादी (श.प.)चे प्रविण राठोड यांनी ५९१ मतांच्या फरकाने दणदणीत विजय मिळवला. ६ (ब) मध्ये भाजपाच्या निकिता आयनेनिवार, तर दुसऱ्या ६ (ब) जागेवर भाजपाच्या सरोजनी ओद्दीवार यांनी अल्प फरकाने विजय मिळवला. अत्यंत हायव्होल्टेज मानल्या जाणाऱ्या प्रभाग ७ मध्ये भाजपाचे माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास किशनराव नेम्मानिवार विजयी झाले. प्रभाग ८ (अ) मध्ये शिवसेना (उ.बा.ठा.) च्या गंगाबाई कोल्हे यांनी माजी नगरसेविका अनिता क्यातमवार यांचा ३० मतांनी पराभव केला, तर ८ (ब) मध्ये शिवसेना शिंदे गटाचे सुरज सातुरवार यांनी ७९६ मतांनी दणदणीत विजय मिळवला. प्रभाग ९ (अ) मध्ये राष्ट्रवादी (अजित पवार गट)च्या शेख सादिका तर ९ (ब) मध्ये राष्ट्रवादी (शरद पवार गट)च्या बेग नईम मिर्झा यांनी माजी नगराध्यक्ष साजिद खान यांचा १४ मतांनी पराभव करत धक्कादायक निकाल दिला.



# 'महाविस्तार ॲप' शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र

- शेतीत डिजिटल क्रांती; आधुनिक शेती पद्धतींचे मार्गदर्शन

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

राज्य शासनाच्या कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी महाविस्तार एआय ॲप लाँच केला असून, या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सल्ला देण्याबरोबरच पिकांवरील रोगही कळणार आहे. 'महाविस्तार ॲप' शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र असुन शेतकऱ्यांनी या ॲप्लिकेशनचा वापर करावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सुनील शिवाजी देवकांबळे यांनी केले आहे.




शेतकऱ्यांना हवामान बदल बाजारपेठेतील अस्थिरता, आणि माहितीच्या अभावामुळे अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. यावर उपाय म्हणून महाविस्तार एआय हे ॲप लाँच केले आहे. हे कृषी विभागाने विकसित केलेले एक अत्याधुनिक ॲप आहे. कृत्रिम बुद्धिमतेच्या सहाय्याने हे ॲप शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीशी संबंधित सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी एकाच ठिकाणी माहिती उपलब्ध करून देते. मराठी भाषेत उपलब्ध असलेले हे ॲप शेतकऱ्यांना रिअल टाइम माहिती, तज्ज्ञांचा सल्ला आणि आधुनिक शेती पद्धतींचे मार्गदर्शन करते.

महाविस्तार एआय ॲपमधील चॅटबॉट शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्वरित उत्तरे देते. रिअल-टाइम हवामान अंदाज, स्थानिक पातळीवरील हवामान अंदाजामुळे शेतकरी पेरणी, कापणी आणि खतांचा वापर यांचे नियोजन करू शकतात. स्थानिक आणि राष्ट्रीय बाजारपेठेतील पिकांचे भाव रिअल-टाइममध्ये दाखवते. कृषी विभागाच्या विविध कृषी योजनांची माहिती, अनुदान, आणि विमा योजनांचे तपशील एकाच ठिकाणी मिळू शकतील. ॲपमध्ये मराठीत व्हिडीओ उपलब्ध आहेत. ज्यात पिकांची लागवड, खतांचा वापर, कापणी, आणि जैविक शेती याबाबत तपशीलवार मार्गदर्शन मिळेल.

ॲपमधील तंत्रज्ञान मध्ये शेतकरी पिकांचे फोटो अपलोड करून पिकांवरील रोग आणि किडींचे निदान करुन उपाय मिळवू शकतात. महाविस्तार एआय ॲप शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य बनवण्यासाठी अनेक फायदे घेऊन आले आहे.

चुकीच्या खतांचा किंवा कीटकनाशकांचा वापर टाळून शेतकरी उत्पादन खर्च कमी करू शकतात.या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य खतांचा वापर, उत्पादन खर्चात बचत आणि आधुनिक डिजिटल शेतीकडे वाटचाल करण्यास मोठी मदत होणार आहे.

> गुगल प्ले स्टोअरवर जाऊन 'महाविस्तार एआय' ॲप डाउनलोड करता येते. याद्वारे शेतकरी स्थानिक हवामान अंदाजानुसार पेरणी, कापणी आणि खतांचा वापर यांचे नियोजन करू शकतात. तसेच कृषी विभागाच्या विविध योजना, शासकीय अनुदान आणि विमा योजनांची माहिती एकाच ठिकाणी मिळते.
>
> **- सुनिल देवकांबळे, ता.कृषी अधिकारी अर्धापूर**

# नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला फटका

**मंचर : (समर्थ गांवकरी)**


सुरेश घुले

मंचर नगरपंचायत निवडणुकीत क्रॉस मतदान झाल्यामुळे याचा मोठा फटका नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला बसल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते सुरेशराव घुले यांनी व्यक्त केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अपयश आले असे म्हणता येणार नाही. नगराध्यक्ष पद जरी हातातून गेले असले तरी ९ नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निवडून आले आहेत. क्रॉस मतदान झाल्यामुळे याचा मोठा फटका नगराध्यक्षपदाच्या उमेदवारास बसल्याचे दिसून येत असून भविष्यात जोरदारपणे राष्ट्रवादीची ताकद वाढवण्यासाठी मंचर शहरात प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# गणोरेत बिबट–मानव संघर्ष टाळण्यासाठी जनजागृती अभियान

- विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग!

**गणोरे : (समर्थ गांवकरी)**

गणोरे ( ता- अकोले ) बिबट प्रवण क्षेत्रामध्ये मानव आणि बिबट यांच्यातील संघर्ष कमी करण्याच्या उद्देशाने, सहाय्यक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र आणि रुरल युथ डेव्हलपमेंट एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती अभियानाचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात गणोरे येथील जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम माहितीपूर्ण ठेवण्यात आला होता, बिबट्याची वागणुक कशी ओळखावी, बिबट्याचा वावर असलेल्या परिसरात कशी काळजी घ्यावी तसेच अनपेक्षित पणे समोर बिबट्या दिसल्यास त्याच्यापासून आपला बचाव कसा करावा हे प्रा विवेक दातीर यांनी अगदी सोप्या भाषेत सांगीतले. बिबट्या कधीही आपल्यापेक्षा उंच असलेल्या प्राण्यावर हल्ला करीत नाही अशा वेळेस जागी एका जागी उभे राहून हात वर करावे व हळूहळू मागे जावे, लहान मुलांनी सायंकाळी रात्रीच्या वेळेस एकट्याने बाहेर पडू नये सोबत आपल्या पालकांना घ्यावे, रात्री घराबाहेर येताना बरोबर बॅटरी आणि काठी सोबत असावी.बिबट्यांविषयी सुरक्षितता आणि सहजीवनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना घरी जाऊन पालकांना देण्यासाठी माहितीपूर्ण पत्रकांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थी हे संदेशवाहक बनून आपल्या कुटुंबांना माहिती देतील, ज्यामुळे अप्रत्यक्षपणे दोन्ही गावांमधील शेकडो लोकांपर्यंत सुरक्षिततेचा संदेश पोहोचणार आहे. कार्यक्रमाच्या समारोपात जेष्ठ शिक्षक संजयकुमार नवले यांनी उपक्रमाचे महत्त्व व प्रभावी सादरीकरण पाहून विवेक दातीर यांचे कौतुक करुन अभिनंदन केले. या कार्यक्रमा संदर्भात सकारात्मक अभिप्राय दिला.



# जय श्रीराम गर्जना देत भगवा फडकवला : काजळे

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर नगरपरिषद निवडणूक मतमोजणी रविवार दि. २१ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेना गटाचे लोकनियुक्त नगराध्यक्षापदी सुजाता मधुकर काजळे ५१४६ मतांनी विजय प्राप्त करून जय श्रीराम गर्जना देत भगवा फडकवला. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार स्नेहल निलेश खोत ४८६४ , राहीन इस्हाक खान कागदी ३८७६ , ॲड तृप्ती वैभव परदेशी ७४७ मतांनी पराभव झाला आहे .

नगरपरिषदेमध्ये सर्व पक्षाचे नगरसेवक पुढीलप्रमाणे : -एकनाथ शिंदे गटाचे शिवसेना ८ ,अजित पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ६ , भारतीय जनता पार्टी २ , अपक्ष २ , काँग्रेस आय १ तसेच उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना १ असे २० नगरसेवक निवडून आलेले आहेत.

एकनाथ शिंदे गटाचे शिवसेना उमेदवार पडलेले मते : खोंड राजश्री संदीप ७६३ , मंदार किरण बुट्टे पा. ६ ८८ , अलका शिवाजी फुलपगार ८६९ , सुवर्णा श्रीकांत जाधव ११५७ , मयूर शिवाजी महाबरे १४२७ , समीर बाळासाहेब पुरवंत ६६० , अंजली अरुण शिंदे ५५९ , विक्रम किरण सिंग परदेशी ६१९ अशी मते आहेत .

अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी गटाचे उमेदवार पडलेले मते : प्रशांत दत्तात्रेय सराईकर ६७१ , अनुजा गणेश पातुरकर ६६५ , इनामदार मोहम्मद अकित अब्दुल मुनाफ १००३ , सना शफी मन्सुरी ९८९, सय्यद मोहम्मद साठी मो कासीद ८७६ , अब्दुल वाजिद अब्दुल रज्जाक इनामदार ७८८ अशी मते आहेत . काँग्रेस आय पक्षाचे राहीन इस्हाक खान कागदी ८१७ मोती पडली आहेत .

# श्रीगोंदा नगरपरिषदेत भाजपाचा झेंडा फडकला

## भाजपाचे स्पष्ट बहुमत विरोधकांना जबर धक्का : नगराध्यक्षपदी सुनिता संतोष खेतमाळीस विजयी

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवत सत्ता काबीज केली आहे. नगराध्यक्षपदी भाजपाच्या सुनिता संतोष खेतमाळीस यांनी विजय संपादन करत शहराच्या राजकारणावर भाजपाचे वर्चस्व सिद्ध केले आहे.

या निवडणुकीत भाजपाने १३ जागांवर निर्विवाद विजय मिळवला असून, शिवसेनेला केवळ ९ जागांवर समाधान मानावे लागले आहे. निकाल जाहीर होताच संपूर्ण शहरात भाजप कार्यकर्त्यांनी फटाके, घोषणाबाजी आणि जल्लोषात विजय साजरा केला, तर विरोधी गोटात निराशेचे वातावरण पाहायला मिळाले.



भाजपाने जवळपास प्रत्येक प्रभागात आपली ताकद दाखवत मतदारांचा स्पष्ट विश्वास संपादन केला आहे. नगराध्यक्षपदासह बहुमत भाजपाकडे गेल्याने आता श्रीगोंदा नगरपरिषदेत आक्रमक निर्णायक आणि विकासाभिमुख राजकारण पाहायला मिळणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. या विजयानंतर विजय उमेदवारांचे माजी मंत्री बबनराव पाचपुते आमदार विक्रम पाचपुते प्रताप पाचपुते यांनी शुभेच्छा देत आनंद व्यक्त केला.

प्रभागनिहाय विजयी नगरसेवक

प्रभाग क्र. १ –
पलनवी पांडुरंग पोटे (शिवसेना),
राजेंद्र खेडकर (भाजपा)

प्रभाग क्र. २ –
सुशिलकुमार शिंदे (शिवसेना), चांदणी दिलीप खेतमाळीस (भाजपा)

प्रभाग क्र. ३ –
एम. डी. शिंदे (भाजपा), अनिता दादा औटी (शिवसेना)

प्रभाग क्र. ४ –
अनिल औटी (शिवसेना),
संग्राम घोडके (भाजपा)

प्रभाग क्र. ५ –
अत्तर शेख (शिवसेना),
दिपाली बोरुडे (शिवसेना)

प्रभाग क्र. ६ –
सोनाली सागर गोरे (भाजपा),
डॉ. अनिल घोडके (भाजपा)

प्रभाग क्र. ७ –
अश्विनी प्रवीण काळे (भाजपा),
अलका सुनिल अनभुले (भाजपा)

प्रभाग क्र. ८ –
ऋषिकेश (बंटी) बोरुडे (शिवसेना),
कोमल विकास बोरुडे (भाजपा)

प्रभाग क्र. ९ –
मनिषा विष्णत आनंदकर (भाजपा), शाहजी तुकाराम खेतमाळीस (भाजपा)

प्रभाग क्र. १० –
प्रशांत गोरे (भाजपा),
मिरा शिंदे (भाजपा)

प्रभाग क्र. ११ –
भामाबाई कोथिंबीरे (शिवसेना), श्रीकृष्ण (बाबूशेठ) धुमाळ (शिवसेना)

## भाजपाचा विजय म्हणजे जनतेचा विकासावर विश्वास

नगराध्यक्षपदी सुनिता खेतमाळीस यांच्या निवडीमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारला असून, श्रीगोंद्यात सत्ता परिवर्तनाने राजकीय समीकरणे पूर्णतः ढवळून निघाली आहेत. महाविकास आघाडीला व राष्ट्रवादी अजित पवार गटाला मात्र नगरपरिषद खाते ही उघडता आले नसून. खूप मोठा दारूण पराभव झाला आहे. खा निलेश यांना मात्र श्रीगोंदा तालुक्याने मोठा झटका दिल्याचे चित्र पहिला मिळाले आहे.

# आ प्रताप पाटील चिखलीकर नांदेड जिल्ह्यात एकटा नडला

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



नांदेड जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य सत्तेत असलेले पक्ष नगर परिषद नगर पंचात निवडणुकी मध्ये एक मेकावर अरोप प्रति अरोप करीत स्वबळावर निवडणुक लढविली होती या मध्ये नांदेड जिल्ह्यातील १२ नगरपरिषदा तर एक नगरपंचायतच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नांदेड जिल्ह्यात एकच आमदार आहेत ते म्हणजे प्रताप पाटील चिखलीकर यांच्यावर पुर्ण नांदेड जिल्ह्याची जबाबदारी होती आणि त्यांच्या समोर ताकद होती भारतीय जनता पार्टी आणि बलाढ्य नेते म्हणजे माजी मुख्यमंत्री खा अशोकराव चव्हाण . खा अजित गोपछडे . यांच्या सह जिल्ह्यातील पाच विद्यमान आमदार मात्र मन्याड खोऱ्यातल्या एकट्या वाघाने एकटा नडला एकटा लडला एकटा भिडला शेवटी बाजी बाजी मारली वाघा नी या म्हणी प्रमाणेच सर्वांना आपल्या ताकदीच्या बळावर जनतेच्या विश्वासावर स्वबळावर राष्ट्रवादी कॉंग्रेसने ७१ जागेवर नगरसेवक तर जिल्ह्यात ३ जागेवर नगराध्यक्ष निवडून आणुन दणदणीत विजय मिळवली व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षच १ नंबर पक्ष असल्याचे इतर पक्षांना दाखवून दिले आहे भारतीय जनता पक्ष ६७ नगरसेवक पदाचे उमेदवार तर ३ नगराध्यक्ष पदाचे उमेदवार निवडून आणून राज्यात एक नंबर असलेला पक्ष मात्र नांदेड जिल्ह्यात दुसऱ्या स्थानी राहिला आहे नांदेड जिल्ह्यात काँग्रेसला चार ठिकाणी मतदारांनी थेट नाकारली असून एकही जागा या नगरपरिषदामध्ये काँग्रेसच्या हाती आली नाही जिल्ह्यात काँग्रेसला खा रविंद्र चव्हाण यांच्या शिवाय दूसरे नेतृत्वच नसल्याने आता काँग्रेसचा जिल्ह्यातून सफाई होईल की काय अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे तर शिवसेना शिंदे गटाचे मीच बढा म्हणणारे ४ आमदार असूनही सात नगर परिषदेत आपले खाते ही उघडू शकता आले नाही ही किती शोकांतिका म्हणावे लागेल जिल्ह्यातील १२ नगरपरिषदा आणि १ नगरपंचायत चा निकाल आज रविवारी जाहीर झाला या निकालात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्ह्यात नंबर एकच पक्ष ठरला आहे त्या पाठोपाठ भाजपाने दुसऱ्या स्थानी झेप घेतली आहे नगरपरिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे नेते प्रताप पाटील चिखलीकर यांनी स्थानिक भाजप नेतृत्वा वर टिकेची झोड उठवत प्रचार वेळी अनेकांवर टिका टिप्पणी केली होता मात्र महायुती होईल असे वाटत असताना भाजप राष्ट्रवादी आणि शिवसेना शिंदे गट स्वतंत्र लढले यात मुख्य नगरपरिषदेत राष्ट्रवादी आणि शिंदे गट एकत्र आला त्यात नगराध्यक्षपदी शिंदे गटाने विजय प्राप्त केला आहे नांदेड जिल्ह्यात झालेल्या निवडणुकीत ३ नगर परिषदेवर भाजपा चे नगर अध्यक्ष तर ३ नगर परिषदेवर राष्ट्रवादी कॉग्रेस अजित पवार गटाचे नगर अध्यक्ष तर २ नगर परिषेदवर काँग्रेस पक्षाचे नगर अध्यक्ष तर २ नगर परिषेदवर शिवसेना शिंदे गटाचे नगर अध्यक्ष तर १ नगर परिषेदवर मराठवाडा जनहीत पार्टी नगर अध्यक्ष पदावर तर १ नगर परिषेदवर शिवसेना उबाठा चे नगर अध्यक्ष निवडून आले आहेत तर देगलूर मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष पदा सह १५ नगरसेवक निवडून आले आहेत तेथे राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता स्थापित झाली आहे व चर्चित लोहा नगरपालिकेचे राष्ट्रवादी काँग्रेसने एक हाती सत्ता काबीज केली आहे येथे भाजपला पराभूत करून राष्ट्रवादी काँग्रेसने १७ नगरसेवक आणि नगराध्यक्ष पद आपल्याकडे खेचून आणले आहे भाजपाला या ठिकाणी मुख्यमंत्री यांची सभा लावून केवळ १ जागा प्राप्त करता आली आहे तर उमरी मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने आपले वर्चस्व कायम ठेवले आहे नगराध्यक्ष पदा सह १८ जागा राष्ट्रवादीने जिंकले आहेत लोहया प्रमाणेच या ठिकाणी भाजपा आणि काँग्रेसला प्रत्येकी एक जागा मिळाली आहे कंधार नगरपरिषदेत काँग्रेसचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार निवडून आला असला तरी या ठिकाणी सर्वात मोठा पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसच आहे कंधार नगर परिषदेत १० नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडून आले आहेत या ठिकाणी वंचित बहुजन आघाडीने आपले जिल्ह्यातील खाते उघडले आहे त्याचवेळी तीन अपक्ष निवडून आले आहेत भारतीय जनता पक्षाने भोकर आणि कुंडलवाडी नगरपरिषद एक हाती सत्ता दाखली आहे तर भोकर नगर परिषदेत नगराध्यक्ष पदा सह १३ जागा भाजपाला मिळाले आहेत या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसने २ मराठवाडा जाणित पार्टी ४ आणि अपक्ष ३ निवडून आले आहेत मुदखेड नगरपालिका परिषदेची भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष पदा सह १४ नगरसेवक ही निवडून आले आहेत त्यामुळे दोन ठिकाणी विजय मिळवला आहे तर राष्ट्रीय काँग्रेसने ४ नगरसेवक विजय झाले आहेत कोंडलवाडी नगरपरिषदेत भारतीय जनता पक्षाचा नगराध्यक्ष सह १४ नगरसेवक निवडून आले आहेत राष्ट्रवादी काँग्रेस काँग्रेस पक्षाचे प्रत्येकी २ नगरसेवक येथे निवडून आले आहेत मुखेड नगर परिषदेत भारतीय जनता पार्टीचे १४ नगरसेवक निवडून आले असले तरी तेथे नगराध्यक्ष मात्र शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी चा झाला आहे शिवसेना शिंदे गटाला येथे ६ जागाही मिळाले आहेत धर्माबाद आणि बिलोली नगरपरिषदेत मराठवाडा जनहीत पार्टी आपले वर्चस्व दाखविले आहेत तर बिलोलीत नगराध्यक्ष पदा सह १४ नगरसेवक विजय झाले आहे काँग्रेस . राष्ट्रवादी काँग्रेस .आणि अपक्षाला प्रत्येकी १ जागा येथे मिळाली आहे धर्माबाद मध्ये मराठवाडा जनहीत पार्टीचा नगराध्यक्ष सह १५ नगरसेवक तर भाजपाचे ७ नगरसेवक येथे निवडून आले आहेत.

## भाजप–महायुतीचा दणदणीत विजय!

महाराष्ट्रातील जनतेचे मन:पूर्वक आभार; कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे फळ – भाजप नेते

**(समर्थ गांवकरी)**




राज्यात पार पडलेल्या नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांत भारतीय जनता पार्टी आणि महायुतीला मिळालेल्या ऐतिहासिक यशाबद्दल भाजप नेतृत्वाने महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानले आहेत. हे यश कोणत्याही एका नेत्याचे नसून, पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या अथक परिश्रमांचे फलित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भाजप नेतृत्वाने सांगितले की, मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे. तसेच भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री मा. जे. पी. नड्डा आणि कार्यकारी अध्यक्ष मा. नितीन नबीन यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाने हे दणदणीत यश संपादन केल्याचे नमूद करण्यात आले.

आकडेवारीतून स्पष्ट होणारा विजय:

दुपारी ३ वाजेपर्यंत आलेल्या कल व निकालांनुसार, २०१७ साली भाजपाच्या ताब्यात ९४ नगरपालिका होत्या; यंदा हा आकडा वाढून १२९ नगरपालिका (४५%) इतका झाला आहे. महायुती म्हणून एकूण २१५ नगरपालिका (७४.६५%) जिंकण्यात आल्या आहेत. (एकूण नगरपालिका : २८८)

नगरसेवकांच्या जागांच्या बाबतीतही भाजपाने लक्षणीय मुसंडी मारली आहे. २०१७ मध्ये भाजपाला १६०२ जागा मिळाल्या होत्या. यंदा हा आकडा थेट ३३२५ (४७.८२%) वर पोहोचला आहे—म्हणजेच दुपटीहून अधिक वाढ. महायुती म्हणून एकूण ४३३१ जागा (६२.३०%) जिंकण्यात आल्या आहेत. (एकूण जागा : ६९५२)

ही निवडणूक महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली झालेली पहिलीच निवडणूक असून, त्यांच्या कार्यकुशलतेबद्दल पक्षाकडून मन:पूर्वक अभिनंदन करण्यात आले. तसेच या निवडणुकीसाठी परिश्रम घेणारे सर्व सहकारी नेते व कार्यकर्ते यांचेही आभार मानण्यात आले.

## घोडेगाव येथील प्रा. समाधान गायकवाड यांचा द्वितीय क्रमांक

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

सार्वजनिक सुरक्षिततेची काळजी असोसिएशन व महाराष्ट्र शासन आयोजित, "शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजना व त्यांची अंमलबजावणी "या विषयावर संपन्न झालेल्या राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत घोडेगाव ता.आंबेगाव येथील बी. डी.काळे महाविद्यालयातील इतिहास विभागातील सहाय्यक प्रा. समाधान गायकवाड यांना राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला आहे. वक्तृत्व स्पर्धा एकूण तीन फेऱ्यांमध्ये आयोजित केली होती.विद्यार्थी गटातून बी.डी.काळे महाविद्यालयातील विद्यार्थी सचिन गिजरे व संध्या वारे हे दोघे शेवटच्या फेरीपर्यंत सहभागी झाले होते.

## ओतूर पोलीसांकडुन गुटखा वाहतुक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि लहु थाटे यांना गोपनिय बामतीदारार्मांफत माहिती मिळाली की, दिनांक २१/१२/२०२५ रोजी रात्रीच्या सुमारास मौजे खिरेश्वर गावच्या हद्दीत कटेनर मधील गुटखा पिकअप गाडीमध्ये भरला जाणार आहे. अशी खात्रीशिर माहिती मिळाल्याने ओतूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी तसेच खिरेश्वर गावचे पोलीसपाटील अभिजीत भौरले,खुबी गावचे पोलीस पाटीलअविनाश सुपे,ग्रामस्थ निलेश भौरले,दिपक मेमाणे यांनी माहिती मिळाले ठिकाणी जावुन खात्री केली असता दिनांक २१/१२/२०२५ रोजी ०२:००ते ०२:३० वा.चे दरम्यान कंटेनर नं. एम.एच. ०१ सी.व्ही. ९१२५ यामधील गुटखा पिकअप गाडी नं. एम.एच. १४ जी.यु. ३७८९ यामध्ये टाकत असताना १) सुरज रघुनाथ मेगळे वय- २३ वर्षे २)अतुल अनिल काळे वय-२५ वर्षे ३) माउली विठ्ठल काळे वय १८ वर्षे रा;-रोहोकल ता:-खेड जि:-पुणे हे मिळुन आले तसेच कंटेनर चालक हा अंधाराचा फायदा घेवुन त्या ठिकाणावरून पळुन जाण्यात यशस्वी झाला.

त्यानंतर पोलीसांनी सदरचा कंटेनर व पिकअप गाडी ओतूर पोलीस ठाण्यात आणुन संपुर्ण मुद्देमालाची खात्री केली असता पिकअप गाडी व कंटेनरमध्ये मिळुन आलेला शशी शेखर एंटरप्रायजेस कंपनिचा शुध्द प्लस पान मसाला व शशी शेखर एंटर प्रायजेस कंपनिचा नवी च्युविंग तंबाखु असा एकुण २८,४०,४०० रू किमतीचा गुटखा व २०,००,००० रू किमतीची दोन्ही वाहने कंटेनर व पिकअप असा एकुण ४८,४०,४०० रू किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. मिळुन आलेल्या मुद्देमालाचा पंचनामा करून पो.कॉ.ज्योतीराम पवार यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने ओतूर पोलीस स्टेशनला गु.र.नं. ३६७/२०२५ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनीनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन वर नमुद तीन आरोपींना अटक करण्यात आले आहे.नमुद गुन्हयाचा पुढील तपास ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारीअधिकारी सहा. पोलीस निरीक्षक लहु थाटे हे करत आहेत.

सदरची कारवाई संदिपसिंह गिल,पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण,रमेश चोपडे अप्पर पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण,धनंजय पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी जुन्नर विभाग जुन्नर यांचे मार्गदर्शना खाली ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि लहु थाटे,पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव, पो.हवा देविदास खेडकर,पो. हवा.बाळशिराम भवारी, पो.हवा. धनंजय पालवे,पो.कॉ.ज्योतीराम पवार,पो. कॉ.मनोजकुमार राठोड,पो.कॉ.संतोष भोसले,पो. कॉ. रोहीत बोंबले तसेच खिरेश्वर गावचे पोलीस पाटील अभिजीत भौरले,खुबी गावचे पोलीस पाटीलअविनाश सुपे,ग्रामस्थ निलेश भौरले,दिपक मेमाणे यांनी केली आहे.

## श्रीरामपूर नगर परिषद निवडणुकीत काँग्रेसचा दणदणीत विजय !

■ २० नगरसेवकांसह नगराध्यक्षपदावरही काँग्रेसची घवघवीत मुसंडी

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**




अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर नगर परिषदेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने मोठा राजकीय विजय संपादन करत पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. या निवडणुकीत मतदारांनी काँग्रेसच्या तब्बल २० नगरसेवकांची निवड करून स्पष्ट बहुमत मिळवून दिले असून नगराध्यक्षपदावरही काँग्रेसच्या उमेदवाराने मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला आहे.

श्रीरामपूर नगर परिषदेच्या एकूण ३४ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत

काँग्रेस – २०

भारतीय जनता पार्टी – १०

शिवसेना (शिंदे गट) – ३

अपक्ष – १ असा निकाल लागला आहे. बहुमताच्या जोरावर काँग्रेसने नगराध्यक्षपदावरही आपला झेंडा फडकावला आहे.

श्रीरामपूर हे शहर पूर्वीपासूनच काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखले जाते. याची प्रचिती या निवडणुकीत पुन्हा एकदा आली आहे. यापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसचे आमदार हेमंत ओगले यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला होता.

या निवडणुकीत नगराध्यक्षपदी निवडून आलेले करण जयंत ससाणे हे काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार असून, यापूर्वी ते श्रीरामपूर नगर परिषदेत उपनगराध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यांच्या मातोश्री राजश्री जयंत ससाणे यांनी काँग्रेसकडून सलग दोन टर्म श्रीरामपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा म्हणून काम पाहिले आहे. तसेच त्यांचे वडील स्वर्गीय जयंत मुरलीधर ससाणे हे शिर्डी साईबाबा संस्थानचे अध्यक्ष तसेच श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघाचे दोन वेळा आमदार राहिले आहेत.

याचबरोबर करण ससाणे यांच्या पत्नी सौ.दिपाली करण ससाणे या युवक काँग्रेसच्या राष्ट्रीय सचिव पदाची जबाबदारी सांभाळत आहेत.

ससाणे कुटुंबाची काँग्रेस पक्षाशी असलेली दीर्घकालीन निष्ठा, सामाजिक कार्यातील सहभाग आणि जनतेमध्ये निर्माण झालेला विश्वास यामुळे मतदारांनी पुन्हा एकदा काँग्रेसवर विश्वास टाकला आहे. श्रीरामपूर शहर व तालुक्यातील मतदार अमनप्रिय व सुज्ञ असल्याने येथे काँग्रेसची परंपरागत विजयी परंपरा आजही कायम राहिल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे.

## सौर प्रकल्पास ग्रामस्थांचा तीव्र विरोध

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत सौर प्रकल्पासाठी चांडोली खुर्द (ता.आंबेगाव) येथील गायरान गट क्रमांक ४८१/१/अ मधील १२ हे.०८ आर क्षेत्र देण्यात येऊ नये, अशी मागणी ग्रामपंचायत चांडोली खुर्द व ग्रामस्थांनी केली आहे.गायरान जमिनीवर सौर प्रकल्पास ग्रामस्थांचा तीव्र विरोध असून या संदर्भात संबंधित प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे. पुणे जिल्हाधिकारी यांना निवेदन भाजप उद्योग आघाडीचे जिल्हा संयोजक प्रमोद बाणखेले, चांडोलीचे उपसरपंच अमोल दाभाडे आणि ग्रामस्थांनी दिले आहे.निवेदनात म्हटले आहे की जिल्हाधिकारी कार्यालय पुणे महसूल शाखेच्या दि. २८ ऑगस्ट २०२३ च्या आदेशानुसार सदर गायरान क्षेत्र सौर प्रकल्पासाठी देण्याची कार्यवाही सुरू असल्याचे ग्रामपंचायतीच्या निदर्शनास आले.

## आ. काळे गटाला धक्का देत कोल्हे गटाचे पराग संधान यांचा दणदणीत विजय

■ या पाच वर्षात सगळ्यांचा हिशोब चुकता करणार : पराग संधान

**कोपरगाव शहर : (समर्थ गांवकरी)**



कोपरगाव नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक अंत्यंत चुरशीची झाली असून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असलेल्या आ.काळे गटाचे काकासाहेब कोयटे यांना जबरदस्त धक्का देत भाजपा कोल्हे गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार पराग संधान (भाजपा) १८५०४ मते घेऊन ४०९ मतांनी विजय झाला असून भाजपा -१५ ,छत्री -३,कपबशी -१ तर घड्याळ -११ असून नगरसेवक पदाचे उमेदवार निवडून आले असून पुढील पुढीलप्रमाणे

प्रभाग क्रमांक १-कपिले सोनाली संदीप,राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटी (18 आढाव वैभव सुधाकर (1219) भारतीय जनता पार्टी

प्रभाग क्रमांक २-शिरसाठ राहुल चंद्रहास (1471) राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ,साबळे स्मिता शैलेश 1441 राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी,

प्रभाग ३-आढाव निर्मला सोमनाथ( 1535) राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कदम जनार्दन सुधाकर (2052) राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी,

प्रभाग क्रमांक ४-उदावंत संजना संजय( 1330) भारतीय जनता पार्टी वाजे आकाश बबनराव (1565) अपक्ष

प्रभाग क्रमांक ५-शिंदे संतोष माधव(1404) भारतीय जनता पार्टी ,वाजे वैशाली विजय(1371)

## लांडेवाडी येथे श्री भैरवनाथ जेष्ठ नागरिक संघाची बैठक संपन्न

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

लांडेवाडी (ता.आंबेगाव) येथील श्री भैरवनाथ जेष्ठ नागरिक संघाची बैठक संपन्न झाली.यावेळी उपस्थित जेष्ठ नागरिकांना वयवंदना कार्ड देण्यात आले. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भैरवनाथ जेष्ठ नागरिक संघाची बैठक संपन्न झाली.फेस्कॉमच्या ४५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधुन राज्यातील प्रथम जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष व फेस्कॉमचे संस्थापक अध्यक्ष डॉ.राधाकृष्ण भट यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालुन पुजा करण्यात आली. भैरवनाथ जेष्ठ नागरिक संघांचे सहखजिनदार खंडेराव आढळराव यांनी जेष्ठ नागरिक, ग्रामस्थ आणि पदाधिकारी यांचे स्वागत करून संघाच्या कार्याबद्दल माहिती दिली.सचिव भाऊसाहेब रासकर यांनी जेष्ठ नागरिक संघाची माहिती सांगितली.आरोग्यमित्र समाधान पवार यांनी जेष्ठ नागरिकांना वयवंदना कार्ड काढुन दिले.यावेळी जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रोहिदास हासे, उपाध्यक्ष मारुती विश्वासराव,सचिव भाऊसाहेब रासकर, सहसचिव गोपाळ शेवाळे, खजिनदार उत्तमराव गव्हाणे, सहखजिनदार खंडेराव आढळराव, प्रभाकर राजगुरू, सल्लागार दादाभाऊ निसाळ, बाळासाहेब राजगुरू व इतर जेष्ठ नागरिक, ग्रामस्थ उपस्थित होते.प्रस्ताविक सहखजिनदार खंडेराव आढळराव यांनी केले.

## साताऱ्यात 'दोन्ही राजें'ची जादू; नगराध्यक्षपदावर भाजपचा रेकॉर्डब्रेक विजय!

■ ४२ हजार मतांचा फरक! साताऱ्यात नगराध्यक्षपदी भाजपचा ऐतिहासिक विजय!

**सातारा : (समर्थ गांवकरी)**





सातारा शहराच्या राजकारणात एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचा दबदबा होता. मात्र कालांतराने बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे आणि साताऱचे दोन्ही राजे एकत्र आल्याने यंदाच्या नगरपालिकेच्या निवडणुकीत चित्र पूर्णपणे पालटले. खासदार उदयनराजे भोसले आणि राज्याचे मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले या दोघांची एकजूट भाजपसाठी संजीवनी ठरली असून, या जोडीसमोर प्रतिस्पर्ध्यांची अक्षरशः धूळधाण उडाली आहे.

सातारा नगरपालिका निवडणुकीत एकूण २५ प्रभागांमधून ५० नगरसेवक पदांसाठी तसेच थेट नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक घेण्यात आली. भाजपच्या पॅनेलविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने जोरदार आव्हान उभे केले होते. प्रचाराच्या काळात शहरात राजकीय वातावरण तापले होते. दोन्ही बाजूंनी सभा, रॅली आणि आरोप-प्रत्यारोपांची मालिकाच सुरू होती. प्रचारात रंगत, निकालात भाजपची सरशी : मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी शहरातील प्रत्येक प्रभागात स्वतः फिरून प्रचाराची धुरा सांभाळली. विकासकामे, केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा प्रभावीपणे उल्लेख करत त्यांनी मतदारांशी थेट संवाद साधला. दुसरीकडे राष्ट्रवादीकडून प्रदेशाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी सभा घेत भाजपवर जोरदार टीका केली. या सभांमध्ये दोन्ही राजे निशाण्यावर होते. मात्र प्रचार कितीही आक्रमक असला तरी निकालाच्या दिवशी मतदारांनी भाजपलाच स्पष्ट कौल दिला.

नगर परिषदेत अभूतपूर्व निकाल : नगर परिषद निवडणूक म्हटली की बहुतेक वेळा ५० ते १०० मतांच्या फरकाने निकाल लागतो.

मात्र साताऱ्यात हा सगळा संकेत मोडीत निघाला. भाजपचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार अमोल मोहिते यांनी राष्ट्रवादीच्या सुवर्णा पाटील यांचा तब्बल ४२ हजार मतांच्या फरकाने पराभव केला. सुवर्णा पाटील यांना केवळ १५ हजार ५५६ मते मिळाली. नगर परिषद निवडणुकीच्या इतिहासात इतका मोठा फरक क्वचितच पाहायला मिळतो.

त्यामुळे "आमदारालाही लाजवेल इतका बहुमताचा विजय" अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. शिवेंद्रसिंहराजेंचा करिष्मा ठरला निर्णायक : या निवडणुकीतील विजयामागे मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची रणनीती निर्णायक ठरली. प्रचाराचे नियोजन, बूथ व्यवस्थापन, कार्यकर्त्यांची फळी आणि मतदारांपर्यंत पोहोचण्याची आखणी त्यांनी अत्यंत काटेकोरपणे केली. खासदार उदयनराजे भोसले आजारपणामुळे फारसे सक्रिय नसले तरी त्यांच्या नावाचा आणि विश्वासाचा प्रभाव मतदारांवर कायम राहिला. परिणामी भाजपने गृहजिल्ह्यात दणदणीत यश मिळवले.

भाजपकडून उमेदवारी नाकारल्यानंतर सुवर्णा पाटील यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. "भाजपने आमच्याशी अन्याय केला, राष्ट्रवादीने आम्हाला सन्मान दिला," असे त्या पक्षांतरावेळी म्हणाल्या होत्या. मात्र निवडणुकीच्या तोंडावर पक्ष बदलल्याचा फटका बसला. मतदारांनी अशा राजकारणाला स्पष्ट नकार देत भाजपच्या उमेदवाराला विक्रमी मतांनी निवडून दिले.

**डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून**

**सातारा जिल्ह्यातील विजयी नगरपालिका – नगराध्यक्ष**

भाजप (७):
म्हसवड – पूजा विरकर
रहिमतपूर – वैशाली माने
वाई – अनिल सावंत
मेढा – रूपाली वाराघडे
मलकापूर – तेजस सोनवले
सातारा – अमोल मोहिते
फलटण – समशेरसिंह नाईक निंबाळकर

राष्ट्रवादी (अजित पवार गट) (२):
महाबळेश्वर – सुनील शिंदे
पाचगणी – दिलीप बगाडे

# कामात अडथळा निर्माण केल्यास कारवाई

- जिल्हाधिकारी - डॉ पंकज आशिया
- जिल्हाधिकारी यांनी घेतला तालुक्यातील विविध विभागाचा आढावा



**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

गेल्या अडीच तीन वर्षापासून जामखेड सौताडा या राष्ट्रीय महामार्गचे काम सुरु असून मुख्य रस्ता असलेला खर्डा चौक ते समर्थ हॉस्पिटल पर्यंतचा शहरातर्गत रस्त्याच्या कामाला गती मिळेना यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जामखेड तहसील कार्यालयात सबंधित विभागाचे अधिकारी ठेकेदार यांना बोलावत कामाबाबत आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी यांनी तात्काळ रस्त्याचे काम पूर्ण करण्याच्या सूचना अधिकारी व ठेकेदार यांना देण्यात आल्या आहेत. जर रस्ता कामात कोणी अडथळा निर्माण करत असेल तर ठेकेदार यांनी पोलिस संरक्षण घेऊन अडथळा निर्माण करण्यावर कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या आहेत.

यावेळी तहसीलदार धनंजय बांगर, गटविकास अधिकारी शुभम जाधव, पोलिस निरीक्षक दशरथ चौधरी, मुख्याधिकारी अजय साळवे, शशिकांत सुतार सार्वजनिक बांधकाम विभाग, रवींद्र घुले तालुका कृषी अधिकारी, दिलीप तिजोरे सहायक निबंधक जामखेड, महावितरणच्या चव्हाण यांच्यासह आदी अधिकारी उपस्थित होते.

अनेक महिन्यांपासून समर्थ हॉस्पीटल ते खर्डा चौक हे काम संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यासाठी ठेकेदार व अधिकारी यांची यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी झाडाझडती घेत हा रस्ता तत्काळ झाला पाहिजे अशा सूचना अधिकारी व ठेकेदार यांना देण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी यांनी रस्त्याबाबत कोण अडथळा निर्माण करत असेल तर त्यांना कायदेशीर कारवाई करा पण रस्त्याबाबत कोणताही निष्काळजी पणा चालणार नाही. त्यामुळे जामखेड सौताडा रस्ता बाबत जिल्हाधिकारी ॲक्शन मोड वर आल्याने जामखेड सौताडा रस्ता लवकर मार्गी लागणार का? हे पाहणे अस्तुक्याचे ठरणार आहे.

तसेच जिल्हाधिकारी यांनी जामखेड येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाची पाहणी करत त्या ठेकेदार यांना लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जामखेड येथे मतदान स्ट्रॉंग रूम ची पाहणी करत तेथील सुरक्षिततेची पाहणी केली आहे. महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती, महावितरण नगरपरिषद , सह विविध विभागांचा घेतला आढावा. 21 डिसेंबर रोजी निकाल असल्याने कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत पोलिस प्रशासनाने योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या आहेत.

कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभमिळालेल्या शेतकऱ्यांच्या शेतीस झिक्री ता. जामखेड येथील शेतकरी चंद्रकांत आजबे यांची फळबाग पाहणी केली. तसेच उपजिल्हा ग्रामिण रुग्णालय जामखेड येथे डॉ. ए पी जे अब्दुल कलाम वाचनालय नगरपरीषद जामखेड भेट दिली. तसेच नगरपरीषद जामखेड निवडणुकीचे स्ट्रॉंग रुमला भेट देऊन पाहणी केली.

# भाजपला आत्मविश्वास तर शिवसेना शिंदे - राकपाला मेहनतीचे फळ मिळाले

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

## नगरपालिका निवडणुकीमध्ये धक्कादायक निकाल

नाशिक जिल्ह्यातील नगरपालिका निवडणुकीमध्ये अनेक धक्कादायक निकाल लागलेले आहेत पण भाजपाला यश मिळाले असले तरी त्याबरोबर इगतपुरी मध्ये 30 वर्षाची सत्ता उलटवून लावण्यात आली आहे तर येवल्यामध्ये माजी खासदार समीर भुजबळ हे परीक्षेत उत्तीर्ण झालेले आहेत. जिल्ह्यामध्ये शिवसेना शिंदे गटाच्या पाच अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला तीन तर भारतीय जनता पक्षाला तीन नगरपालिकांमध्ये नगराध्यक्ष पद मिळालेले आहे एकूणच महायुतीचा बोलबाला राहिला असला तरी देखील नाशिक मध्ये मात्र भाजपाला शिवसेना शिंदे गटाने मात्र रोखले आहे जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी दि.२ आणि २० डिसेंबर अशा दोन टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडली. नगराध्यक्षपदाच्या ११ जागांसाठी एकूण ५३ तर नगरसेवकपदाच्या २६४ जागांसाठी एक हजाराहून अधिक उमेदवार रिंगणात आहेत. जिल्ह्यात एकूण ६५.९४ टक्के मतदान झाले होते. यामध्ये त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेत सर्वाधिक म्हणजे जवळपास ८५ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर आज रविवारी (दि.२१) रोजी मतमोजणी पार पडली असून, जिल्ह्यातील बहुतांशी ठिकाणी महायुतीचे उमेदवार नगराध्यक्षपदासह विजयी झाले आहेत. येवला या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपा या ठिकाणी एकत्रित निवडणूक लढवत होती तर या ठिकाणी शिंदेंची शिवसेना ही सत्तेमध्ये असताना देखील आपल्याच मित्र पक्षांबरोबर विरोधात लढली त्यामुळे या ठिकाणी सत्तेतीलच पक्षांमध्ये लढाई झाली नक्कीच कोण निवडून येणार याकडे सर्वांचे लक्ष होते या ठिकाणी निवडणुकीला प्रक्रिया सुरू होण्याच्या आधी काही दिवस राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी उपमुख्यमंत्री आणि समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष छगन भुजबळ यांची प्रकृती अस्वस्थामुळे मुंबईमध्ये रुग्णालयात दाखल झालेले होते. त्यांच्या गैरहजेरीमध्ये या भागाची सर्व जबाबदारी ही माजी खासदार आणि भुजबळ यांचे पुतणे समीर भुजबळ यांनी घेतली अक्षरशः या परिसरामध्ये समीर भुजबळ तसेच आमदार पंकज भुजबळ, शेफाली भुजबळ यांनी येवल्या मध्ये ठाण मांडून जोरदार लढाई केली. त्यामुळे शिवसेना शिंदे पक्षाला पाहिजे तसे यश संपादन करता आले नाही.

# चोरी विरोधी यंत्राची जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती जुन्नर व समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर मधील श्रीराज प्रमोद कुमार जाधव याने तयार केलेल्या चोरी विरोधी यंत्रणा या प्रकल्पाची पुढील जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाल्याची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये इयत्ता सहावी ते आठवी या गटामध्ये श्रीराज प्रमोदकुमार जाधव याने तयार केलेला चोरी विरोधी यंत्रणा(Anti Theft Detection System) याचा प्रथम क्रमांक आला.या प्रकल्पाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली तसेच चला प्रयोग करूया या प्रकल्पाचा(इ.६ वी ते ८ वी गटामध्ये ) द्वितीय क्रमांक आला. भित्तिपत्रक या स्पर्धेमध्ये सहावी ते आठवी या गटात नचिकेत प्रदीप सूर्यवंशी याचा द्वितीय क्रमांक व पावर पॉइंट प्रेझेंटेशन या स्पर्धेत अंजली योगेश खेत्री हिचा इयत्ता नववी ते बारावी या गटामध्ये द्वितीय क्रमांक आला. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पर्यवेक्षक अनिल उकिरडे, विज्ञान विभाग प्रमुख भगवंता घोडे, पंकज घोलप,मंगेश तांबे,विशाल चौधरी,संतोष कांबळे,मिलिंद खेत्री,अनिल जवरे,रसिका शेळके, संतोष सोनवणे,बाळासाहेब साबळे यांनी मार्गदर्शन केले.सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रभाकर तांबे,राजेंद्र डुंबरे,रघुनाथ तांबे,प्रदीप गाढवे, पंकज घोलप,मुख्याध्यापिका राजश्री भालेकर,संजय हिरे,अजित डांगे यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# निवडणुकीच्या मतदान यंत्रात छेडछाड झाल्याचा आरोप

**मंचर : (समर्थ गांवकरी)**



मंचर येथील नगरपंचायत निवडणुकीच्या मतदान यंत्रात छेडछाड झाल्याचा आरोप उद्धव ठाकरे शिवसेना पक्ष नेते राजाराम बाणखेले यांनी केला आहे.मतदानानंतर दुसऱ्या दिवशी लागणारा निकाल तब्बल २० दिवसानंतर लागला.या काळात मतदान यंत्रात छेडछाड करण्यात आली असून मंचर शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला एवढी कमी मते पडणार नाहीत.नक्कीच काहीतरी गडबड झाल्याची शंका व्यक्त केली.

# मंजूवाले यांचा अश्व बघिरा बनला प्रथम क्रमांकाचा विजेता

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



दक्षिण काशी यात्रेची ओळख असलेल्या नांदेड जिल्ह्यातील सुप्रसिध्द असलेल्या खंडोबा यात्रेत झालेल्या पशू प्रदर्शनात आकर्षणाचे केंद्र ठरलेल्या मंजूवाले यांचा अश्व बघीरा विजयी झाला असून, नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बघीरा अश्वाला भेट देऊन मालकाचे अभिनंदन केले आहे, दि २३ डिसेंबर रोजी कंधार लोहा मतदार संघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यात प्रथम क्रमांकाचे बक्षीस ४१ हजार व सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. पंजाब येथील अश्व लाईन मधील नामांकित असलेला आलिशान या रक्त वाहिनी असलेला अश्व बघीरा यांची उंची ६७ इंच असुन सूदढ बांधा व देखाणा असलेल्या अश्व यांने प्रसिध्द असलेल्या माळेगाव यात्रेत पशु प्रदर्शनात भाग घेऊन दोन दात गटामध्ये गेल्या दोन वर्षी सतत प्रथम विजेता ठरला, यावेळी पशुधन विकास अधिकारी डॉ.विजय कातकडे, डॉ.गायकवाड यांची उपस्थिती होती. मारवाड जातींचा असुन दहा महिन्यांचा असतांनाच मंजू वाले हा अश्व खरेदी करून आणला आहे,पंजाब येथुन आणला असुन परिवारात अश्व असल्याने आमच्या कुटूंबीयाची आतापर्यंत भरारी झाली असून दैनंदिन चारा,चन्ना,खाघ पदार्थ,असुन आपल्या परिवारातील जेवणातील ही खाघ त्यास देण्यात येतात ,केवळ हौसे पोटी हा अश्व पाळल्याचे सांगितले,सदरील अश्वाला बघण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.माळेगांव यात्रेत बघीरा अश्व प्रथम आल्याबद्दल मंजूवाले यांचे मित्र परिवार यांनी अभिनंदन केले आहे बघिरा हा अश्व अजय देवगण च्या आजाद चित्रपटातील असलेला अश्व च्या पोटचा असून ते उंच्या व मोठया खांदणी असल्याचे माहिती मुंजु वाले नंदु शेठ अडकटलवार यांनी दिली आहे.

# हादगाव नगर परिषदेवर शिवसेना शिंदे गटाचा भगवा फडकला

- सौ. रोहिणी भास्कर वानखेडे विजयी
- जिल्ह्यात फक्त हदगांव नगरपरिषद भाजप, सेना(शिंदे)युती होती
- शिवसेना शिंदे गट भाजप युतीचे, काँग्रेसचे 5 तर
- शिवसेना उबाठा गटाचे 7 उमेदवार विजयी
- भाजप तालुका अध्यक्ष (शहर)बाळापाटील कदम पराभूत



**तामसा : (समर्थ गांवकरी)**

हदगाव नगरपरिषद निवडणूक २०२५ आज दि.२१ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन शिवसेना शिंदे गटाच्या सौ. रोहिणी भास्कर वानखेडे या १२९३ च्या मतांची आघाडी घेत विजयी झाल्यात तर त्यांच्या प्रतिस्पर्धी सौ. कुमुद सुनील सोनुले यांना ४३१७ मत तर सौ. रोहिणी भास्कर वानखेडे यांना ५६१० मतदान मिळाले तर शिवसेना उबाठा गटाचे उमेदवार सौ. सीमा बालाजी घाळप्पा यांना ३७३९ मतदान मिळाले असून सौ. रोहिणी भास्कर वानखेडे यांनी १२९३ एवढ्या मतांची आघाडी घेत दणदणीत विजय संपादन केला.

हदगाव नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनी भाजपा सह युती करत ही निवडणूक लढवली त्यात माजी खासदार सुभाष वानखेडे यांनी प्रचाराची धुरा सांभाळत निवडणूक मैदान गाजवले पण शिवसेनेला १६ जागांपैकी फक्त पाच जागांवर समाधान मानावे लागले तर भाजपाने चार जागा लढवत त्यातून तीन जागांवरती विजय संपादन केला त्यामुळे भाजपाने हदगाव नगरपालिकेमध्ये चांगले यश संपादन केले असेच म्हणावे लागेल. शिवसेना उबाठा गटाचे विद्यमान खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी ही निवडणूक स्वबळावर लढवत सात जागांवरती दणदणीत विजय संपादित केला तर सतत दहा वर्ष हदगाव नगरपालिकेत सत्तेत असणारी काँग्रेस पक्षाला यावेळेस फक्त पाच जागांवर समाधान मानावे लागले. एकंदरीत या निकालावरून माजी खासदार सुभाष वानखेडे यांचे हदगाव शहरांवर आज सुद्धा वरचष्मा कायम असल्याचे दिसून येते. तर हादगाव शहरातील नागरिक हे नेहमीच विद्यमान आमदार यांच्या बाजूने राहून आपला शहराचा विकास कसा साध्य करायचा यात या निकालावरून ही बाब लक्षात येते.

भाजप न आपली ताकत दाखवत माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण, भाजप जिल्हा अध्यक्ष ॲड किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचारात तालुका अध्यक्ष भागवत देवसरकर,सूर्यकांत हनवते, शिरीष मनाठकर, उपसभापती तातेराव वाकोडे, महेश मठपती, शिवराज वारकड,सुधाकर भोंरे,डॉ. भगवान निळे, डॉ. दिपक नाईक, अर्जुन जोशी,यांनी भाजप उमेदवार साठी परिश्रम घेतं हदगांव नगरपरिषद मध्ये ३ नगरसेवक निवडून दिलं.



# पार्वतीबाई महाजन यांचे निधन

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

तामसा येथील जेष्ठ नागरिक पार्वतीबाई परमेश्वरआप्पा महाजन (वय ९०) यांचे रविवारी (ता. २१) निधन झाले. त्या माजी सरपंच प्रभाकर महाजन, माजी सरपंच बालाजी महाजन यांच्या मातोश्री होत त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना, जावई, नातू, पंतू असा परिवार आहे.त्यांच्या अंतिमसंस्कार तामसा येथे वैकुंठ धाम येथे करण्यात आलं अंतिम संस्कार च्या वेळी माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, अरविंद कंठाळे,डॉ संजय मुरमुरे, भागवत देवसरकर, गोविंद पवार, केशव हरण सह मान्यवर यांनी आदरांजली वाहिली.

# कंधार नगरपालिकेत आगळा-वेगळा निकाल

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्रातील नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये अनेक ठिकाणी चुरशीचे सामने पाहायला मिळत असताना नांदेड जिल्ह्यातील कंधार नगरपालिकेत एक आगळा-वेगळा आणि लक्षवेधी निकाल लागला आहे. कंधार नगरपालिकेच्या *प्रभाग क्रमांक 1 (ब)* मधून एका सामान्य कुटुंबातील कार्यकर्ता मयुर नळदकर यांना मतदान ६७७ मतदान झाले तर काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार भोसीकर यांची सुनबाई संजीवनी ताई ५२७ मतदान झाले तर तब्बल *150 मतांनी पराभूत करून दणदणीत विजय* मिळवला आहे.

या विजयामुळे कंधार शहरासह संपूर्ण जिल्ह्यात राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. मयुर नळदकर हे अत्यंत साधी राहणीमान असलेले, सामान्य कुटुंबातील सामान्य कार्यकर्ते असून त्यांनी थेट जनतेशी संपर्क, सातत्यपूर्ण काम आणि विश्वासाच्या बळावर हा ऐतिहासिक विजय संपादन केला आहे.

प्रभाग क्रमांक 1 (ब) मधील *भिमगड नगर, एकनाथ नगर, व्यंकटेश नगर व वाहतूक नगर* या भागांतील नागरिकांनी मयुर नळदकर यांच्यावर विश्वास टाकत त्यांना विजयी केले. निकाल जाहीर होताच समर्थकांनी जल्लोष केला.

विजयानंतर मयुर नळदकर यांनी *श्री स्वामी समर्थ महाराज मंदिरात जाऊन दर्शन घेतले* व विजयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर काढण्यात आलेल्या विजय मिरवणुकीत त्यांनी नागरिकांशी संवाद साधत मतदारांचे आभार मानले.

यावेळी बोलताना मयुर नळदकर म्हणाले,

“मला तुम्ही निवडून दिले, याचा मला सार्थ अभिमान आहे. मी दिलेला शब्द पाळणार आहे. आपल्या प्रभागात लाईट, पाणी, रस्ते, मंदिरे तसेच इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे. प्रभागाचा सर्वांगीण विकास हाच माझा ध्यास असेल.”*

या विजयामागे मतदारांचा विश्वास तर आहेच, मात्र *श्री स्वामी समर्थ महाराजांचे आशीर्वाद* आणि *सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख प्रा. मनोहर धोंडे सरांचे मार्गदर्शन, सहकार्य व आशीर्वाद* यामुळेच हा विजय शक्य झाला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# नगरपंचायतीच्या विजयाचे सर्व श्रेय पदाधिकाऱ्यांना

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

मंचर नगरपंचायत निवडणूकीत मंचरकरांनी पत्नी राजश्री गांजाळे यांना नगराध्यक्ष पदासाठी कठीण काळात सर्वांनी साथ दिल्यामुळे शक्य झाले. विजयाचे सर्व श्रेय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार शरद सोनवणे व शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक यांचे असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली मंचर गावच्या विकासासाठी काम करणार आहे. अशी प्रतिक्रिया शिवसेना शिंदे पक्षाचे नेते आणि माजी सरपंच दत्ता गांजाळे यांनी व्यक्त केली.



ठाणे : दिवा शिवसेना उपशहर प्रमुख ॲड. आदेश भगत यांच्या प्रभाग क्र २७ मधील साबेगाव येथे नूतन प्रचार कार्यालयाचे उदघाट्न मा. उपमहापौर रमाकांत मढवी यांच्याहस्ते करण्यात आले. प्रसंगी मा. नगरसेवक शैलेश पाटील, मा. नगरसेवक अमर पाटील, मा. नगरसेविका दीपाली भगत तसेच उमेश भगत, अर्चना पाटील, यांच्यासह इतर पदाधिकारी तसेच विभागप्रमुख व शाखाप्रमुख, कार्यकर्ते उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )

# श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेत भव्य शैक्षणिक प्रदर्शनी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेनिमित्त जिल्हा परिषद नांदेड व पंचायत समिती लोहा, शिक्षण विभागाच्या वतीने भव्य शैक्षणिक प्रदर्शनी उभारण्यात आली असून, ही प्रदर्शनी यात्रेकरू, विद्यार्थी व पालकांमध्ये विशेष आकर्षण ठरत आहे. ही शैक्षणिक प्रदर्शनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या प्रेरणेने, तसेच शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे व गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली साकारण्यात आली आहे. या शैक्षणिक प्रदर्शनामध्ये नवे शैक्षणिक ॲप, अंधश्रद्धा निर्मूलन, शालेय परसबाग, माता-पालक गट, मोफत शैक्षणिक योजना, आपत्ती व्यवस्थापन, विद्यार्थी लाभांच्या योजना, विविध शिष्यवृत्ती योजना, गुड टच–बॅड टच, मुख्यमंत्री माझी शाळा यासह विविध शासकीय शैक्षणिक योजनांची सविस्तर माहिती देणारे फलक लावण्यात आले आहेत.

प्रदर्शनस्थळी उपस्थित शिक्षकांकडून यात्रेकरूंना प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात येत असून, विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त वाचनीय पुस्तकांची यादी देखील येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे. या शैक्षणिक प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भाविक, विद्यार्थी, पालक व नागरिकांनी भेट दिली असून माळेगाव यात्रेतील हे प्रदर्शन सर्वांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरत आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षण विस्तार अधिकारी अंजली कापसे, सरस्वती आंबलवाड, विठ्ठल आचणे, डी. आर. शिंदे, केंद्रप्रमुख दत्ता मोहिते, मंगल सोनकांबळे, केंद्रीय मुख्याध्यापक गंगाधर धुळगंडे, तसेच व्यंकट गायकवाड, गजानन अप्परवाड, विषयतज्ज्ञ संजय अकोले, हावगीराव जामकर, बाळू चव्हाण, सचिन किरवले, रवी रायफळे, पल्लवी चौंडेकर, महानंदा केदारे, रफिक दौलताबादी, सिद्धार्थ सोनकांबळे, संदीप साखरे, मारुती डोके, बी. एम. जंगापल्ले, राजेंद्र पाटील, अरविंद ढवळे, बाळू घोरपडे, अजित केंद्रे, अण्णाराव घुमणार

यांच्यासह माळेगाव यात्रा, रीसनगाव व माळकोळी केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांनी परिश्रम घेतले आहेत.

## यात्रेकरूंमध्ये विशेष आकर्षण

या शैक्षणिक प्रदर्शनाचे विशेष आकर्षण म्हणजे राज्य पुरस्कारप्राप्त सेवानिवृत्त शिक्षक वि. मा. काकडे यांनी सादर केलेला अभिनव उपक्रम होय. यामध्ये प्रश्नमंजुषा, गणिती खेळ, बुद्धीचा खेळ व संख्याज्ञान यासंबंधीचे फलक व प्रात्यक्षिके काकडे यांनी मांडली आहेत. आपल्या ८० व्या वाढदिवसानिमित्त त्यांनी या ठिकाणी भरघोस पारितोषिकांची घोषणा केली होती. ११ प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्यास ५०१ रुपये, ९ अचूक उत्तरे देणाऱ्यास २०१ रुपये तर ८ प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्यास १०१ रुपये अशी पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

# ओंकार शुगर मिल मधील ऊसतोड कामगारांना ब्लँकेट व साडी वाटप

## मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा महाराष्ट्र राज्य ग्रुपचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रात कौतुकास्पद आहे : चेअरमन बाबुराव बोत्रे





**शहादा : (समर्थ गांवकरी)**

मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा ग्रुप, महाराष्ट्र राज्य प्रमुख व राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान विभागीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) यांचा संकल्पनेनुसार दि.१८ व १९ डिसेंबर २०२५ नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील, ओंकार शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज युनिट ९ मधील ऊसतोड कामगारांना थंडीवाऱ्यापासून संरक्षण मिळविण्यासाठी ब्लँकेट व ऊसतोड कामगार भगिनींना साडी परिवर्धे गाव व परिसरात ऊसतोडीसाठी वास्तव्यास असलेल्या कामगारांना थंडीपासून बचाव व्हावा व त्यांचे आरोग्य सुरक्षित राहावे, या उदात्त हेतूने मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा ग्रुप, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दि.१८ व १९ डिसेंबर २०२५ रोजी सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत थेट शेतात जाऊन ३२२ ऊसतोड कामगारांना ब्लँकेट व साड्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

थंडीच्या दिवसांत उघड्यावर वास्तव्यास असलेल्या ऊसतोड कामगारांना अनेक आरोग्यविषयक अडचणींना सामोरे जावे लागते. ही बाब लक्षात घेऊन मानवसेवा हीच खरी ईश्वर सेवा ग्रुपचे प्रमुख डॉ. श्री. मनीलाल रतिलाल शिंपी यांच्या नेतृत्वाखाली चंद्रानंद कृषी पणन संस्थेचे अध्यक्ष, कृषी उत्पन्न बाजार समितीचे निवृत्त सचिव डॉ.यशवंत अनंत म्हात्रे, दैनिक स्वराज्य संपादक डॉ. किशोर बळीराम पाटील, स्वामीनारायण हॉलचे संचालक डॉ. दिनेश भाई ठक्कर, एवढी संडे रोटी डे ग्रुपचे प्रमुख डॉ. नितील चंदेया, भिवंडी पोलीस पाटील संघाचे मा.अध्यक्ष अँड.सोमनाथ ठाकरे, परिवर्धा परिसरातील आरोग्य सेवक, राज्यपाल सन्मानित समाजसेवक डॉक्टर किशोर आमोदकर,समाजसेवक उद्योजक डॉ.रामचंद्र देसले,या सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी ओंकार शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज चे चेअरमन९ पुरुषोत्तम नगर, साखर कारखान्याचे चेअरमन श्री.बाबुराव बोत्रे पाटील यांचा उपस्थितीत जनरल मॅनेजर संजीव गुरव व मिलिंद पटेल, मुख्य शेतकी अधिकारी श्री.जगन्नाथ जगताप यांनीही या उपक्रमांचे विशेष कौतुक केले.गरजू घटकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचून मदत करण्याची भूमिका या ग्रुपची नेहमीच राहिली असून, त्याचाच हा एक भाग असल्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सेवानिवृत्त सचिव डॉ.श्री. यशवंत अनंत म्हात्रे यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती भिवंडीचे सेवानिवृत्त सचिव डॉ. यशवंत अनंत म्हात्रे, स्वामीनारायण मंदिर हॉल ट्रस्टचे संचालक डॉ. श्री. दिनेशभाई ठक्कर, रोटी डे ग्रुपचे प्रमुख डॉ.श्री. निखील चंदेरीया, पोलीस पाटील संघाचे माजी अध्यक्ष तथा आदित्य टाइम्सचे संपादक अँड. सोमनाथ बाळाराम ठाकरे परिवर्धन परिसरातील आरोग्य सेवक राज्यपाल सन्मानित समाजसेवक डॉक्टर किशोर आमोदकर, सोनवल येथील मनोहर पाटील, तऱ्हाडी,जावदे येथील श्री. महेश पाटील,श्री. गणेश पाटील ,कारखान्याचे शेतकी अधिकारी

यावेळी उपस्थित मान्यवरांनी मानवसेवेच्या कार्याचे कौतुक करत समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत व्यक्त केले. मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा ग्रुप सामाजिक बांधिलकीतून सातत्याने राबवत असलेले उपक्रम प्रेरणादायी असल्याचे मत दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील यांनी मांडले.ओंकार शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज युनिट ९ पुरुषोत्तम नगर, साखर कारखान्याचे चेअरमन श्री.बाबुराव बोत्रे पाटील यांचा उपस्थितीत जनरल मॅनेजर संजीव गुरव व मिलिंद पटेल, मुख्य शेतकी अधिकारी श्री.जगन्नाथ जगताप, ऊस पुरवठा अधिकारी श्री. पांडुरंग राजपूत, श्री.गणेश चव्हाण, श्री. प्रशांत पाटील,तऱ्हाडी गटाचे फील्ड अधिकारी श्री.संजय शिंपी,यांनी विशेष सहकार्य केले.

# शिंदखेडा मतदारसंघात भारतीय जनता पार्टीला मोठा धक्का

**शिंदखेड : (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्रात नुसत्याच नगरपरिषदेच्या निवडणुका पार पडल्या असून दिनांक 21 डिसेंबर रोजी या निवडणुकीच्या लागलेल्या निकालात महाराष्ट्रात पुन्हा महायुतीने बाजी मारलेली असून भारतीय जनता पार्टी हाच नंबर एकचा पक्ष असल्याचे स्पष्ट झाले आहे त्या पाठोपाठ शिंदे शिवसेना पक्ष दुसऱ्या क्रमांकावर तर महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्ष तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे समोर आले आहे भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्रातील नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषदेच्या निकालांवर सर्वात जास्त भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष निवडून आणले असून मात्र धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा नगरपरिषद बिनविरोध घडवून आणण्यास भारतीय जनता पार्टीचे धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री व कॅबिनेट मंत्री जयकुमार भाऊ रावल यांच्या नेतृत्वाला मोठे यश आले मात्र शिंदखेडा नगरपरिषद नगर अध्यक्ष पद भारतीय जनता पार्टीला राखता आले नाही या मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कलावती सुकलाल माळी या नगराध्यक्ष पदासाठी विजय झाल्या राष्ट्रवादी मात्र साक्री मतदारसंघात डॉक्टर योगिता जितेज चौरे या 7366 मत मिळवून निवडून आले त्याचप्रमाणे शिरपूर वरवाडे नगरपरिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने मोठा विजय मिळविलेला असून या ठिकाणी 32 जागांपैकी 31 नगरसेवक पदी भाजपचा विजय झाला असून श्री चिंतन भाई अमरीश भाई पटेल हे येथे नगर अध्यक्ष पदासाठी निवडून आले

# ५ माजी विद्यार्थ्यांचा सन्मान

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

मंचर येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाच्या ५ माजी विद्यार्थीनी आर्मीमध्ये प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल त्याचा महाविद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. अशी माहिती प्राचार्य डॉ.नानासाहेब गायकवाड यांनी दिली. रयत क्रीडा अकादमीचे खेळाडू विद्यार्थी देशातील विविध भागात खडतर असे प्रशिक्षण पूर्ण करून देश सेवेसाठी रुजू हेण्याअगोदर प्रणव वाबळे,रोशन वाघमारे,विशाल पिंगळे ,साहिल चासकर,आशिष गायकवाड यांनी मंचर येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यायास भेट दिली. प्राचार्य डॉ.एन.एस.गायकवाड यांनी त्याचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.प्रशिक्षणवेळी आलेले अनुभव त्यांनी उपस्थित प्राध्यापकासमोर माडले.

# कंधार पालिकेवर काँग्रेसचा झेंडा

- नगराध्यक्षपदी काँग्रेसचे शहाजी नळगे विजयी
- आमदार चिखलीकर यांना २० पैकी १० जागा

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



नगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप व काँग्रेस या तिन्ही राष्ट्रीय पक्षाने उमेदवार उभे केले होते. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नगराध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे उमेदवार शहाजी अरविंद नळगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार स्वप्निल उर्फ हणमंत लुंगारे यांचा २३४६ मतांनी पराभव केला तर भाजपचे गंगाप्रसाद यन्नावार हे तिसऱ्या क्रमांकावर फेकले गेले आहेत. पालिकेवर काँग्रेसचा झेंडा फडकला असून आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या राष्ट्रवादी पक्षाला २० पैकी २० जगावर समाधान मानावे लागले.

प्रभाग निहाय सदस्य पुढील प्रमाणे आहेत. प्रभाग क्रमांक १(अ) मध्ये काँग्रेसच्या वैशाली दिलीप बसवंते यांनी (५९६) यांनी भाजपच्या मयुरी राजरत्न जोंधळे (४४२) यांचा १५४ मतांनी पराभव केला. प्रभाग (ब) मध्ये अपक्ष मयूर विजय नळदकर(६७७) यांनी काँग्रेसच्या संजीवनी राजेंद्र भोसीकर (५२७) यांचा १५० मतांनी पराभव केला. प्रभाग क्रमांक २ (अ) मध्ये काँग्रेसच्या सुनिता दिलीप पवार (१२६४) यांनी राष्ट्रवादीच्या पारुबाई पवार (४२४) यांचा ८४० मतांनी पराभव केला. प्रभाग २ (ब) मध्ये वंचितचे दिलीप देशमुख ( ९७०) यांनी राष्ट्रवादीचे निलेश गौर (७७१) यांचा १९९ मतांनी पराभव केला.

प्रभाग क्रमांक ३ (अ) मध्ये राष्ट्रवादीचे मन्नान चौधरी (१०७९) यांनी काँग्रेसचे शेख इरफान (६१३) यांचा ४६६ मतांनी पराभव केला. ३ (ब) मध्ये राष्ट्रवादीच्या कैसर बेगम( ९२६) यांनी काँग्रेसच्या शेख शबाना (७४५) यांचा १८१ मतांनी पराभव केला. प्रभाग ४ (अ) मध्ये काँग्रेसच्या देऊबाई बनसोडे (८५६) यांनी राष्ट्रवादीच्या सुनंदा जिंके (५९३) यांचा २६३ मतांनी पराभव केला. ४ (ब) मध्ये काँग्रेसचे भास्कर नळगे (१००४) यांनी राष्ट्रवादीचे गिरीश मामडे (५४६) यांचा ४५८ मतांनी पराभव केला.

प्रभाग ५ (अ) मध्ये राष्ट्रवादीचे समिरुल्ला अमिरुल्ला(९५७) यांनी काँग्रेसचे हमीद सुलेमान (६६६) यांचा २९१ मतांनी पराभव केला. ५ (ब) मध्ये राष्ट्रवादीच्या परवीन तब्स्सूम (९१९) यांनी काँग्रेसच्या शाहीन बेगम (६९२) यांचा २२७ मतांनी पराभव केला. प्रभाग ६ (अ) मध्ये राष्ट्रवादीचे प्रकाश कदम (१३८१) यांनी काँग्रेसचे राजेंद्र कांबळे(८३९) यांचा ५४२ मतांनी पराभव केला. ६ (ब) मध्ये राष्ट्रवादीच्या पठाण परवीन बेगम (११८०) यांनी काँग्रेसच्या शेख नूरजहा बेगम (७९५) यांचा (३८५) पराभव केला.

प्रभाग ७ (अ) मध्ये राष्ट्रवादीच्या कविता कांबळे (८९७) यांनी काँग्रेसच्या सारिका मळगे (८४४) यांचा ५३ मतांनी पराभव केला. ७ (ब) मध्ये राष्ट्रवादीचे म. जफरोद्दीन(६२५) यांनी काँग्रेसचे दीपक बडवणे (६१०) यांचा १५ मतांनी पराभव केला. प्रभाग ८ (अ) मध्ये अपक्ष कुसुम कांबळे (६४६) यांनी वंचीतच्या वर्षा कांबळे (५७४) यांचा ७२ मतांनी पराभव केला. ८ (ब) मध्ये काँग्रेसचे सुधाकर कांबळे (७२१) यांनी राष्ट्रवादीच्या शैलेश बोरलेपवार(६८८) यांचा ३३ मतांनी पराभव केला.

# कुंभेरी नदी जीवघेण्या प्रदूषणाच्या विळख्यात

- पडघा परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**



भिवंडी तालुक्यातील मुंबई–नाशिक महामार्गालगत असलेल्या भातसा नदीच्या उपनदी कुंभेरी नदीचे प्रदूषण पुन्हा एकदा शिगेला पोहोचले आहे. कुंभेरी नदीच्या पाण्यावर हिरवा तवंग दिसू लागल्यामुळे हा हिरवा तवंग नक्की कोणत्या कारणाने निर्माण झाला आहे. नदीतील पाणी पूर्णतः दूषित का झाले आहे याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे. पाण्याच्या पृष्ठभागावर हिरवा तवंग आणि शेवाळ साचल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. परिणामस्वरूप नदीचे पाणी गंभीर प्रदूषणाच्या विळख्यात सापडले असून परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कुंभेरी नदीकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. काही महिन्यांपूर्वीही जलपर्णी आणि सांडपाण्यामुळे नदीचे अस्तित्व धोक्यात आले होते. अवकाळी पावसामुळे जलपर्णी वाहून गेली होती; मात्र पुन्हा एकदा प्रदूषणाने कुंभेरी नदीला घेरले आहे. स्थानिक नागरिकांनी वारंवार आवाज उठवूनही प्रदूषण रोखण्याबाबत कोणतीही सक्षम कारवाई करण्यात आली नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ, तहसील कार्यालय तसेच संबंधित यंत्रणांनी नदीपात्राची पाहणी केली असली तरी कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. नदीपात्रातील दुर्गंधी, पाण्यातील शेवाळ आणि डासांची वाढ पाहता परिसरात डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका वाढत असल्याचे आरोग्य तज्ज्ञांचे मत आहे. कुंभेरी नदी अनेक गावांच्या पाणीपुरवठ्याचे प्रमुख साधन आहे. भाजीपाला उत्पादन, शेती, मासेमारी तसेच आदिवासी बांधवांचा उदरनिर्वाह या नदीवर अवलंबून आहे. तसेच नदीकिनारी असलेल्या प्रसिद्ध कुंभेरेश्वर महादेव मंदिरामुळे या नदीला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. दरवर्षी शिवरात्री महोत्सवासाठी हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. पडघा ग्रामपंचायतीने लाखो रुपये खर्च करून घाट, पथदिवे व विसर्जन व्यवस्था केली असली तरी नदीची बिकट स्थिती पाहता नागरिकांनी नदीकाठाकडे पाठ फिरवल्याचे चित्र आहे. शेतीतील रसायने, औद्योगिक सांडपाणी, गोठ्यातील मलमूत्र यामुळे नदीत सूक्ष्म पोषक द्रव्यांचे प्रमाण वाढले आहे. नदीची रुंदी कमी होणे, पाण्याचा प्रवाह घटणेही प्रदूषणाला कारणीभूत ठरले आहे. हानीकारक शैवाल वाढीमुळे सूक्ष्म पोषक वाढल्यामुळे ,रसायनमुळे ऑक्सिजनचा पूरवठा कमी होऊन पार्किन्सन, गॅस्ट्रोइंटेस्टाइनल विकार, किडनी विकार सारखे रोग होतात.

# चारा पिकांचे बाजारभाव वाढले

**मंचर: (समर्थ गांवकरी)**

सध्या आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गावांमध्ये जनावरांच्या चाऱ्याचा तुटवडा निर्माण झाल्याने चारा पिकांचे बाजारभाव वाढले असून मका पिकाला मोठ्या प्रमाणावर भाव आला आहे.जास्त पैसे देऊनही मका तसेच उसाची वाढे मिळत नसल्याचे शेतकऱ्यांनी केली. सध्या मक्याचे ताटे व उसाचे वाढे कमी प्रमाणात निघत असल्याने वाढ्यांचे ही बाजारभाव वाढल्याने जनावरांना चारा उपलब्ध कसा करायचा हा प्रश्न शेतकऱ्यांपुढे पडला आहे.दुधाचे बाजारभाव कमी असून त्यातून रतिबाचे बाजारभाव वाढलेले आहेत. तसेच सध्या ओला चारा मिळत नसल्याने शेतकरी वर्ग अडचणीत आला असून ओला चारा शोधत आहे.परंतु असलेल्या ओल्या चाऱ्याला मोठ्या प्रमाणावर भाव द्यावा लागत असल्याने आर्थिक अडचण निर्माण होत आहे.

# भाजपाचे वर्चस्व, सौ. जयश्री थोरात नगराध्यक्षपदी विजयी!

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**



शिर्डी नगरपरिषद निवडणूक २०२५ चा अंतिम निकाल जाहीर झाला असून या निवडणुकीत भारतीय जनता पक्षने स्पष्ट वर्चस्व सिद्ध केले आहे. नगराध्यक्ष पदासाठी भाजपाच्या सौ. जयश्री विष्णू थोरात यांनी दणदणीत विजय मिळवत नगराध्यक्षपदावर आपले नाव कोरले आहे. या विजयामुळे शिर्डी नगरराजकारणात भाजपाची पकड अधिक मजबूत झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

प्रभागनिहाय निकाल पाहता बहुतांश प्रभागांमध्ये भाजपाच्या उमेदवारांनी बाजी मारली आहे. प्रभाग क्रमांक १ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे निलेश मुकुंदराव कोते आणि भाजपाच्या सुनिता मंगेश त्रिभुवन विजयी झाल्या. प्रभाग क्रमांक २ मध्ये अपक्ष सतीश (नंदूभाऊ) गोंदकर यांच्यासह भाजपाच्या सौ. सुनिता वसंत गोंदकर यांनी विजय मिळवला.

प्रभाग क्रमांक ३ मध्ये शिवसेना (शिंदे गट)च्या सौ. आशा कमलाकर कोते आणि बापू पांडुरंग ठाकरे यांनी यश संपादन केले. प्रभाग क्रमांक ४, ५ आणि ६ मध्ये भाजपाने क्लीन स्वीप करत सर्व जागांवर विजय मिळवला. या प्रभागांमध्ये गायत्री बर्डे, नितीन कोते, अभय शेळके पाटील, विद्या जाधव, सचिन गायकवाड आणि कोमल बोऱ्हाडे हे भाजपाचे उमेदवार विजयी झाले.

प्रभाग क्रमांक ७ मध्ये अपक्ष उमेदवारांनी वर्चस्व राखत सरिता सोनवणे आणि अमित शेळके यांनी विजय मिळवला. प्रभाग क्रमांक ८ मध्ये भाजपाचे रविंद्र गोंदकर विजयी झाले असून सौ. छाया पोपट शिंदे या अपक्ष उमेदवार बिनविरोध निवडून आल्या. प्रभाग क्रमांक ९ मध्ये भाजपाच्या अलका गोतीस यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे दिपक गोंदकर विजयी झाले.

प्रभाग क्रमांक १० आणि ११ मध्ये भाजपाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले. प्रभाग १० मध्ये वैशाली कोते व नितीन कोते, तर प्रभाग ११ मध्ये छाया शिंदे, अरविंद कोते आणि प्रतीक्षा कोते हे तिन्ही उमेदवार भाजपाकडून विजयी झाले.

# कंधारमध्ये कोणत्याही पक्षाला बहुमत नाही

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



नगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप व काँग्रेस या तिन्ही राष्ट्रीय पक्षाने उमेदवार उभे केले होते. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नगराध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे उमेदवार शहाजी अरविंद नळगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार स्वप्निल उर्फ हणमंत लुंगारे यांचा २३४६ मतांनी पराभव केला तर भाजपचे गंगाप्रसाद यन्नावार यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. प्रभाग क्रमांक १(अ) मध्ये काँग्रेसच्या वैशाली दिलीप बसवंते यांनी (५९६) यांनी भाजपच्या मयुरी राजरत्न जोंधळे (४४२) यांचा १५४ मतांनी पराभव केला. प्रभाग (ब) मध्ये अपक्ष मयूर विजय नळदकर(६७७) यांनी काँग्रेसच्या संजीवनी राजेंद्र भोसीकर (५२७) यांचा १५० मतांनी पराभव केला. प्रभाग क्रमांक २ (अ) मध्ये काँग्रेसच्या सुनिता दिलीप पवार (१२६४) यांनी राष्ट्रवादीच्या पारुबाई पवार (४२४) यांचा ८४० मतांनी पराभव केला. प्रभाग २ (ब) मध्ये वंचितचे दिलीप देशमुख ( ९७०) यांनी राष्ट्रवादीचे निलेश गौर (७७१) यांचा १९९ मतांनी पराभव केला.

# आळंदी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी भाजपचे प्रशांत कुऱ्हाडे पाटील विजयी

## माजी नगराध्यक्षा वैजयंता उमरगेकर यांनी रचला नवा इतिहास ; सर्वाधिक मताधिक्याने विजय

**आळंदी: (समर्थ गांवकरी)**



आळंदी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी भाजपचे प्रशांत कुऱ्हाडे पाटील यांना १२ हजार ७२४ मते मिळाली. तर राष्ट्रवादी काँग्रेस चे प्रकाश कुऱ्हाडे पाटील यांना ६ हजार ३४ मते मिळाली. प्रशांत कुऱ्हाडे यांनी पहिल्या फेरी पासून आघाडी घेत दहाव्या फेरी अखेर ६ हजार ६९० मताधिक्याने विजय मिळवला. आळंदी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत भाजप १५ , शिवसेना ४ तर राष्ट्रवादी काँग्रेसचे २ जागांवर उमेदवार विजयी झाले. या निकालाने आळंदी नगरपरिषदेवर भाजपची एक हाती सत्ता आल्याने भाजपने विजया नंतर जल्लोष केला. विजयी उमेदवारांनी जल्लोषात मिरवणुका काढून माऊली मंदिरात श्रींचे दर्शन घेतले. यावेळी आळंदी शहरातून फटाक्याची आतिषबाजी, गुलाब, भंडाऱ्याची मुक्त उधळण करीत ढोल, ताशा तसेच घंटेचा ठणठणाट करीत दणक्यात उत्साही, आनंदी वातावरणात मिरवणूक काढल्या. यावेळी विजयी उमेदवारांचे समर्थकांनी जल्लोष करीत उमेदवारांचे अभिनंदन करीत विजयोत्सव साजरा केला.

नगराध्यक्ष पदाचे निवडणुकीत १९ हजार १६५ मते वैध ठरली. यात भाजपचे प्रशांत कुऱ्हाडे पाटील बहुमत मिळवित विजयी झाले. त्यांनी पहिल्या फेरी पासून शेवटच्या दहाव्या फेरी पर्यंत सर्व मतदान केंद्रावर आघाडी घेत विजय मिळविला. आळंदी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक निर्णय अधिकारी जयराज देशमुख, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी प्रभाग क्रमांक १ ते १० मधील निवडणुकीचा निकाल जाहीर केला.

प्रभाग निहाय निकालांत भाजपच्या उमेदवारांनी मताधिक्याने विजय संपादन केला. प्रभाग २ (अ) मध्ये भाजपच्या वैजयंता अशोक उमरगेकर यांनी १८६२ मते मिळवत १५४८ मतांच्या आघाडी घेत नवा इतिहास रचला . नगराध्यक्ष पडण्याची परंपरा मोडीत काढत त्यांनी विजयाची परंपरा निर्माण केली. प्रभाग ५ ( ब ) भाजपच्या खुशी सागर बोरुंदिया यांनी १७०२ मते घेत १२९७ मतांची आघाडी घेतली. प्रभाग ८ ( अ ) मधून भाजपचे माजी उपनगराध्यक्ष सचिन रामदास गिलबिले ९६४ मतांच्या आघाडीने विजयी झाले. प्रभाग ७ ( ब ) मधून सुनील ज्ञानेश्वर घुंडरे ७२६ मतांनी विजयी झाले. प्रभाग ४ ( ब ) मध्ये भाजपचे गोविंदा उर्फ सागर कुऱ्हाडे ५५४ मते, प्रभाग ५ ( अ ) संतोष मारुती रासकर ५३३ मते, प्रभाग ६ ( अ ) मध्ये साक्षी अक्षय कुऱ्हाडे मते, प्रभाग ९ ( अ ) मध्ये माजी नगरसेवक दिनेश रामदास घुले ४३३ मते, प्रभाग २ ( ब ) मधून माजी उपाध्यक्ष रामचंद्र दत्तात्रय भोसले ३४९ मतांची आघाडी घेत विजय मिळवला.

प्रभाग १० ( ब ) भाजपच्या ऋतुजा अनिकेत तापकीर २३१ मतांची आघाडी घेऊन विजयी झाल्या. प्रभाग ६ ( ब ) मध्ये हेमंत गुलाबराव कुऱ्हाडे १६८ मतांची आघाडी घेऊन विजय मिळवला. प्रभाग ४ ( अ ) मध्ये कांचन किरण येळवंडे १५४ मतांची आघाडी, प्रभाग ३ ( अ ) मध्ये पूजा संजय घुंडरे ७५ मतांची आघाडी घेऊन कमी फरकाने विजय मिळवला. प्रभाग ३ ( ब ) मध्ये सोमनाथ कुंडलिक कुऱ्हाडे ५१ केवळ मतांची आघाडी घेत निसटता विजय मिळवला. प्रभाग ८ ( ब ) मध्ये भाजप उमेदवार सुजाता कालिदास तापकीर यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी जयराज देशमुख यांनी केली.

शिवसेना शिंदे गटाच्या चार जागा निवडून आल्या. या मध्ये प्रभाग १ ( अ ) मधून पती- पत्नी निवडून आले आहेत. ऋतुजा आदित्य घुंडरे ६०३ मतांची आघाडी घेतली. तर प्रभाग १ ( ब ) मध्ये आदित्य हनुमंत घुंडरे ५५७ मतांची आघाडी घेऊन विजयी झाले. प्रभाग १० ( अ ) मध्ये उद्योजक सुरेश खंडेराव झोंबाडे यांनी २५९ मतांची आघाडी घेऊन तिसर्या प्रयत्नात विजय संपादन केला. प्रभाग ७ ( अ ) मधून अरुणा ज्ञानेश्वर घुंडरे यांनी १२० मतांची आघाडी घेत विजय मिळवला.